
# संपादकीय

## पाकिस्तान-भारत यातील वाङ्‌मयीन आदानप्रदानाची वाढती जाणीव!

भारताचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी आणि पाकिस्तानचे लष्कर प्रमुख व स्वयंघोषित राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्यातील आग्रा शिखर परिषद दोन्ही बाजूंना अडचणीत आणणारी ठरली असली तरी भारत-पाकमधील संवाद पुन्हा सुरू होण्याच्या दृष्टीने तिचे योगदान महत्त्वपूर्ण मानायला हवे. राजकीय दृष्ट्या फाळणीनंतर हे दोन देश स्वतंत्र झाले असले तरी सांस्कृतिक भौगोलिक दृष्ट्या यांच्यात हजारो वर्षांपासून जो अंत:प्रवाह वाहत आहे,तो कायमच आहे; हेच यावेळी पुन्हा सर्वांना जाणवले. दूरचित्रवाणीवरून आणि वृत्तपत्रांतून या शिखर परिषदेला जी प्रसिद्धी मिळाली, ती या दोन्ही देशातील सर्वसामान्य जनतेनेही अत्यंत औत्सुक्याने पाहिली, एखाद्या क्रिकेट सामन्यासारखीच रसिकांची गर्दी दूरचित्रवाणीच्या संचापुढे तासन्‌तास खिळून राहिली. लोकांच्या त्यामुळे अपेक्षाही उंचावल्या. या दोन्ही देशांतील जनतेला शांतता व सलोखा हवा आहे; परस्परसंपर्क सुलभपणे साधता यावा अशी इच्छा आहे. कृत्रिम राजकीय भिंती मध्ये नकोत अशीही भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. या निमित्ताने आणखी एका गोष्टीची निकड जाणवली. ती म्हणजे भारत व पाकिस्तान यामधील वाङ्‌मयीन संस्कृतीच्या जवळिकतेची! भारतीय साहित्य हे पाकिस्तानमध्ये भारतीय चित्रपटांप्रमाणेच लोकप्रिय आहे; त्यामानाने पाकिस्तानमधील नवे साहित्य इकडे वाचायला मिळत नाही. हिंदी, उर्दू, पंजाबी, सिंधी, इंग्लिश या भाषांद्वारे दोन्ही देशात वाङ्‌मयीन पातळीवरचे साहचर्य हे अधिक घनिष्ट होऊ शकेल. पाकिस्तानमधील काही कवींनी ही भावना आपल्या काव्यरचनांमधून प्रकट केली. पत्रकार संपादकांनीही तिला दुजोरा दिला. प्रकाशनक्षेत्रानेही या दिशेने काही पावले पुढे टाकून या दोन देशांमधील सांस्कृतिक अभिसरण अधिक गतिमान करायला हवे.

पाकिस्तानमध्ये कवींना जनतेच्या हृदयात खूप आदराचे स्थान आहे. मुशायऱ्यांना उपस्थिती मोठ्या प्रमाणावर असते. तेथील कवी हे आपल्या रसिकांची मने जाणून त्यांना थेट साद घालतात. त्यांच्या मनातल्या भावभावनांना उदात्त उन्मत रूपात मांडतात. त्यांची भाषा रसिकांच्या हृदयात भिडते. किश्वर नहीद ही लोकप्रिय कवयित्री म्हणते, ''पाकिस्तानच्या कवींनी लोकांच्या मनातील भावना अंत:करणापासून प्रकट करण्याची सिद्धी प्राप्त केली आहे.'' किश्वर नहीदच्या गजला हजारो रसिकांच्या ओठावर बागडत असतात. 'लोककवी' म्हणून ख्यातनाम असलेला हबीब जालिव हा कवी, क्रांतिकारक विचार मांडतो, म्हणून त्याला अधिकृत मुशायऱ्यांमध्ये सहसा सामील होता येत नाही. परंतु त्याचे कार्यक्रम जेथे कुठे असतील






तेथे त्याच्या चाहत्यांची एकच गर्दी उसळते. फैझच्या मृत्यूला वीस वर्षे लोटली, तरीही त्याच्या गझलांची पुस्तके नव्या पुस्तकांसारखीच सतत वाचकांच्या हाती दिसतात. पाकिस्तानी कवींनी उर्दू गझला व शेरोशायरी यांना देशातच नव्हे तर देशाबाहेरही एक स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून स्थान मिळवून दिले आहे. गझलगायकांचे कार्यक्रम युरोप-अमेरिकेतही मोठ्या प्रमाणावर होत असतात. उर्दूबरोबर हिंदी-पंजाबी शैलीचाही मुक्तपणे या गझलांमध्ये आविष्कार होतो, त्यामुळे त्यांच्या आवाहकतेत भरच पडत राहिलेली आहे.

उर्दू कवींच्या या लोकप्रियतेचा तेथील राज्यकर्त्यांनाही हेवा वाटतो; आणि त्यांच्या विचारातील परखडपणाने किंवा अस्वली चिमटयांनी त्यांचा रक्तदाबही वाढतो. अशा काही कवींवर अंकुश लावण्याचा प्रयत्नही अधूनमधून होतो. पण त्यामुळे त्या कवींच्या आक्रमकतेत आणि लोकप्रियतेत भरच पडते हे बघून राज्यकर्ते कपाळाला हात लावतात.

गझलांमध्ये वाच्यार्थापेक्षा ध्वन्यर्थाला खूप महत्त्व असते; आणि प्रत्यक्ष टीकेपेक्षा अप्रत्यक्ष शेरेताशेरे हे तेथील रसिकांना अधिक अर्थपूर्ण वाटतात; त्यामुळे कवींचे वार हे अधिक धारदार ठरतात. पाक राज्यकर्त्यांची त्यामुळे भीक नको पण कुत्रे आवर अशी अवस्था होते. ''जोपर्यंत पाकिस्तानात लष्कराचे दडपशाही वर्चस्व आहे तोपर्यंत आमच्याकडे लेखनाला भरपूर मालमसाला मिळत राहील'' असे किश्वर नहीद ही कवयित्री म्हणते. आपले मत ती कोपरखळ्या मारत व्यक्त करते. असे परखड शरसंधान करण्यात तेथील कवयित्री विशेष आनंद मानतात; कारण त्यांना हात लावायला तेथील सत्ताधीश घाबरतात. तसलिमा नासरिन हिला बांगलादेशामध्ये जसा त्रास झाला तसा सध्याच्या या पाकमध्ये कोणा कवयित्रीला झालेला नाही.

पाकिस्तानातील प्रकाशन व्यवसाय हा भारताच्या मानाने अगदीच नगण्य आहे. वर्षाकाठी जेमतेम पाचशे पुस्तके तेथे निघतात. लेखकांची संख्याही मर्यादित आहे. काव्यसंग्रहाबरोबरच कादंबऱ्या, लघुकथा, लेखसंग्रह, विनोदी साहित्य वगैरे प्रकारानांही मागणी आहे. उर्दू-हिंदीपेक्षाही तेथे इंग्रजी पुस्तके जास्त खपतात. वाचनाचे प्रमाण उच्च मध्यमवर्गात अधिक आहे. त्यामुळे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसतर्फे तेथे इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन मोठ्या संख्येने होते. तसेच उर्दू साहित्यही इंग्रजीत भाषांतरित करून त्याचीही पुस्तके निघतात.

भारतात दरवर्षी वीस हजारावर पुस्तके प्रसिद्ध होतात. केवळ मराठीचा विचार केला तरी वर्षाला दीडदोन हजार नवीन पुस्तके निघतात. हिंदी व उर्दू पुस्तकांची संख्याही चारपाच हजाराच्या घरात जाते. पुस्तकांच्या आयातीबाबत पाक सरकारचे धोरण उदारपणाचे आहे. त्यामुळे पाकिस्तानमध्ये पुस्तके चोरून छापण्याचे प्रकार तुरळच दिसतात. बांगलादेशात बंगालीभाषेतील भारतीय पुस्तकांच्या अनधिकृत आवृत्त्या सर्रास छापल्या जातात; तसा प्रकार येथे नाही. याचा फायदा घेऊन भारतीय पुस्तकांची पाकिस्तानात निर्यात अधिक होण्याला मोठा वाव आहे. त्यासाठी नव्या मार्केटिंग तंत्राचा वापर केला पाहिजे. या दोन देशांतील जनतेला परस्पर संवाद व सद्‌भाव हवा आहे; वैचारिक व भावनिक आदानप्रदान हवे आहे. राज्यकर्त्यांच्या आडमुठेपणाने मुक्त संवादात अडथळे निर्माण झालेले आहेत, ते जेवढे कमी होतील तेवढी या दोन




देशांतील नागरिकांमधील मैत्री व आपुलकी वाढेल. प्रकाशनव्यवसाय याबाबतीत खूप मोठी भूमिका बजावू शकेल. भारतीय पुस्तके जितक्या जास्त प्रमाणात पाकिस्तानात जातील, तेवढी ही परस्पर सौहार्दाची प्रक्रिया परिपुष्ट होत राहील. पाकिस्तानमधील आघाडीवरच्या लेखकांच्या कथाकादंबऱ्या या देखील भारतीय भाषांमध्ये उपलब्ध व्हाव्यात अशी पावले प्रकाशकांनी उचलली पाहिजेत. राजकीय दृष्ट्या आपली फाळणी झालेली असली तरी आपले युगानुयुगांचे सांस्कृतिक संबंध हे अतूट आहेत अशीच ग्वाही आग्रा शिखर परिषदेच्या निमित्ताने या दोन देशांतील साहित्यिक कलावंतांनी मुक्त मनाने दिलेली आहे. दोन देशांतील या वाटाघाटी अनिर्णित राहिल्या, फिसकटल्या, अपेक्षी ठरल्या वगैरे चर्चा होत जाईल; पण सांस्कृतिक, वाङ्मयीन दृष्ट्या आपल्यात दुरावा नाही, तो राहू नये असाच विचार दोन्ही देशांतून प्रकट झाला ही एक महत्त्वाची उपलब्धी आहे.

प्रकाशन व्यवसायाने या मानसिकतेची दखल घेऊन एकमेकांच्या साहित्याकडे अधिक लक्ष देऊन ते दोन्ही देशात सहजपणे मिळत राहावे यासाठी प्रयत्नशील राह्यला हवे. प्रकाशनक्षेत्राला हा आग्रा शिखरपरिषदेचा एक खास संदेश आहे असे मानले पाहिजे.


## तसलिमा नासरिन यांची पुस्तके










| | | |
|---|---|---|
| लज्जा (कादंबरी) | अनु. लीना सोहोनी | १२५रु. |
| फेरा (कादंबरी) | अनु. मृणालिनी गडकरी | ७०रु. |
| निर्बाचित कलाम (लेख) | अनु. मृणालिनी गडकरी | १५०रु. |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य (लेख) | अनु. मृणालिनी गडकरी | १२०रु. |
| निर्बाचित कविता (कविता) | अनु. मृणालिनी गडकरी | ७०रु. |
| आमार मेयेबेला (आत्मचरित्र) | अनु. मृणालिनी गडकरी | २००रु. |

**आजच मागवा.**
**पोस्टखर्चासह रक्कम मनीऑर्डरने पाठवा.**




## साहित्यवार्ता

### 'थिरकवाँ शैली'

नामदेव प्रतिष्ठान आणि दि इव्हिनिंग इव्हेन्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने प्रबोधनकार ठाकरे सभागृह येथे 'थिरकवाँ शैली' पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत झाले.

पद्मभूषण म. उस्ताद अहमदजान थिरकवाँ यांचे गंडाबद्ध शागीर्द बापू पटवर्धन (मुंबई) यांनी उस्तादजींच्या तबला वादनशैलीतून अभिव्यक्त होणारी 'वाणी विचारधारा' शब्दबद्ध केली आहे. ज्येष्ठ तबलासाधक पं. भाई गायतोंडे यांचे हस्ते 'थिरकवाँ शैली' चे प्रकाशन झाले.

नागपूरचे संगीत समीक्षक 'सुरमुरिद' बाळ होते, पद्मभूषण पं. रामनारायणजी, उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ, पं. पंढरीनाथ नागेशकर, पं. गिरीधरप्रसाद जयपूरवाले, गंगाधरराव गोरे, पं. तुळशीदासजी बोरकर, सौ. आरती अंकलीवार-टिकेकर, श्री. दीपक रणदिवे, ज्येष्ठ संवादिनी वादक पं. मनोहरचंद्र चिमोटे इ. मान्यवर उपस्थित होते.

उत्तरार्धात बापू पटवर्धन व त्यांचा शिष्य कुमार अनींदम भट्टाचार्य (वय ११ वर्षे) यांचे स्वतंत्र तबला वादन झाले. गायिका सौ. आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या सुश्राव्य गायनाने समारोहाची सांगता झाली.

### आदिवासी भाषांमधील 'ढोल'चे प्रकाशन

आदिवासी बोलीभाषा व विशेषत: अहिराणी बोली काळाच्या ओघात नामशेष होऊ नये यासाठी 'ढोल' हे नियतकालिक प्रकाशित होते. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरील आदिवासींच्या जाणिवा, भाषा, श्रद्धा, परंपरा, समजुती यांचे यथार्थ चित्रण ढोल नियतकालिकातून होत असल्याने आदिवासींची बोलीभाषा उर्वरित महाराष्ट्रापर्यंत पोचते.

ढोल हे नियतकालिक बडोद्याच्या भाषा केंद्राद्वारे प्रकाशित केले जाते. अहिराणी, पावरी, देहवाली, राठवी, कुंकणी, डांगी, डुंगरी भिली, पंचमहाली भिली, भांतू, चौधरी, गोर बंजारा अशा एकूण दहा बोलींमध्ये ढोल प्रकाशित होते. मराठी भाषेतही ढोल संकलित स्वरूपात प्रकाशित करण्यात येते. ढोलच्या अहिराणी आवृत्तीचे संपादक डॉ. सुधीर देवरे हे कला, लोकजीवन व लोकवाङ्मयाचे अभ्यासक आहेत. त्यांचे मराठी व अहिराणी भाषेत कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. ग्रामीण भागातले आदिवासी लोकजीवन अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावे हा 'ढोल'चा प्रमुख उद्देश आहे.

## गोंडी साहित्य

गोंडी साहित्य संमेलने सन १९८८ पासून आयोजित करण्यात येत आहेत. भद्रावती, वर्धा, कोरबा, सरगुसा, रतनपूर, आसिकाबाद, भोपाळ, भिलाई व नागपूर अशा विविध ठिकाणी आतापर्यंत गोंडी साहित्य संमेलने झाली आहेत. गोंडी भाषा; सांस्कृतिक, कला, इतिहास व धर्म यासंबंधी त्यात चर्चा होते. ज्यांची मूळ भाषा गोंडी आहे आणि ज्यांचे संस्कार गोंडी संस्कृतीला अनुसरून आहेत, त्या व्यापक जनसमुदायाकरिता हे संमेलन असल्याने मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, ओरिसा इत्यादी राज्यातील साहित्यिक मंडळी या संमेलनाला उपस्थित असतात.

गोंडी भाषिकांचे हे संमेलन असल्यामुळे 'आदिवासीत्व'ला जागा नाही. कारण 'आदिवासी' या शब्दाला घेऊन वर्षानुवर्षे हा समाज अन्यायाने पीडित आहे. एवढेच नव्हे तर तथाकथित गैरआदिवासी देखील स्वत:ला 'आदिवासी' संबोधून खऱ्या म्हणणाऱ्या आदिवासीच्या हक्कांवर आच आणत आहे. गोंडी (कोया) संस्कृती व धर्म याबद्दलचे विचार या साहित्य संमेलनात व्यक्त होतात. ज्या विचारवंतांना यासंबंधी जाणीव झाली त्यांनी गोंडी संस्कृती, धर्माचा अवलंब केला. हा धर्म लादण्याचा प्रश्‍नच उद्भवत नाही. गोंडी साहित्यविषयक लेखन आतापर्यंत बरेच झालेले आहे.

परसापेन या परमशक्तीचे उपासक, पूजक म्हणजे कोयावंशीय जनसमुदाय. या समाजात ७५० गोत्रे अस्तित्वात आहेत. या गोत्रांची विभागणी सम, विषम देवगणात झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही गोंडी विचारधारा विस्तृत स्वरूपात आजही कायम आहे. ही गोंडी साहित्याची एक जमेची बाजू आहे. असे नागपूरच्या आत्माराम उऊके यांनी म्हटले आहे.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

नवे आनंदाचे आयुष्य उभे करायचे. चिरस्थायी नाती शोधायची. पण चिरस्थायी नाती कुठली? सगळी नाती अशीच नासणारी. धागा सुरूवातीला मजबूत असतो. मग हळूहळू कसर लागू लागते. गुंते, गाठी होतात. दिसत नाहीत एकदम. कापून काढाव्या म्हटले, तर धागा तुटतो. मग तो तसाच केविलवाणेपणाने हातात पकडून त्यात काहीतरी गुंफत रहायचे. कदाचित पोकळ, ओघळणारे मणीच. वाटते, माळ तयार होते आहे.-- पण तो असतो एक भास. सर्व मानवी नात्यांना असलेला हा शाप आहे!

**उत्तरार्ध**

**लेखिका : विजया राजाध्यक्ष** **किंमत : १३० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




## वाचक चळवळ पांढरपेशांपुरतीच मर्यादित राहिल्याची खंत

इतर कोणतेही माध्यम वाचनाची जागा घेऊ शकणार नसले तरी वाचक चळवळ ही शहरी आणि मूठभर पांढरपेशा समाजापुरतीच मर्यादित राहिली आहे, अशी खंत ख्यातनाम समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी व्यक्त केली.

मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीने ग्रंथाली चळवळीचे संस्थापक दिनकर गांगल यांना 'रा. ज. देशमुख स्मृती पुरस्कार' देण्यात आला. ते म्हणाले, वाचनाची सवय लुप्त झाली तर समाज ज्ञानाच्या दृष्टीने रसातळाला जाईल. वाचन करताना माणूस चिंतन करत असतो. दृश्य माध्यमाच्या बाबतीत असे होत नाही. त्यामुळेच वाचन ही परिपूर्ण गोष्ट असून तिला पर्याय नाही, असे ते म्हणाले.

ग्रंथाली ही महाराष्ट्रातील अभिनव चळवळ असून मध्यमवर्ग मात्र त्याबाबत उदासीन असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. खेड्यापाड्यातील नवसाक्षर वर्ग हा मोठ्या उत्सुकतेने साहित्य संमेलनांकडे वळू लागला आहे पण मोठे साहित्यिक या संमेलनांकडे फिरकतही नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली. चांगली मराठी पुस्तके या नवसाक्षरांपर्यंत पोहोचली पाहिजेत आणि साहित्य संस्थांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले.

समाजाशी संवादी होतो म्हणून ग्रंथाली चळवळ विस्तारली, असे नमूद करीत ग्रंथालीचे दिनकर गांगल म्हणाले की, जागतिकीकरणामुळे एकूणच अनिश्चितता आणि असुरक्षिततेचे सावट पसरले आहे. अशा परिस्थितीत ग्रंथप्रेमी वाचकांच्या आधाराने ही चळवळ उभी आहे. प्रास्ताविक डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांनी तर आभारप्रदर्शन प्राचार्य कौतिकराव ठाले यांनी केले.

## पुल स्मृतिदिन

मालेगावच्या 'पुल' कट्ट्यावर पुलंच्या चाहत्यांनी पुलंचा पहिला स्मृतिदिन त्यांच्या आठवणी, किस्से सांगून आणि त्यांच्या ध्वनीफिती ऐकून साजरा केला.

आपल्या जीवनप्रवासातला काही काळ पु. ल. देशपांडे यांनी मालेगावच्या महात्मा गांधी विद्यामंदिरात व्यतीत केला होता. आठवणींच्या या कार्यक्रमात यशवंत सोनावणे, काशीनाथ पाटील, ॲड. डी. एस. कुलकर्णी, लक्ष्मणराव टिपरे, अशोक फराटे, शरद ब्राह्मणकर, अशोक पाटील, ॲड. प्रकाश शर्मा, अरुण विसपुते यांनी भाग घेतला.

## दासू वैद्य यांची निवड

विविध भाषेतील लेखकांचा परस्पर संपर्क व्हावा, अन्य प्रांतातील संस्कृतीची ओळख व्हावी यासाठी साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रवासवृत्तीसाठी तरुण कवी व लेखक दासू वैद्य यांची निवड झाली आहे.

## कोलकाता येथे साहित्य शिबिर

कोलकाता महाराष्ट्र मंडळात एक दिवसीय साहित्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. उद्घाटन विश्वभारती विद्यापीठाच्या प्रा. वीणा आलासे यांचे हस्ते झाले. मंडळाचे वार्षिक 'सागर'च्या २५ व्या अंकाचेही प्रकाशन झाले. प्रभा भिडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. सूर्यकांत कुळकर्णी व श्री. सुबोध शेणॉय यांची बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपाध्यक्षपदी व विभागीय कार्यवाह म्हणून निवड झाल्याबद्दल मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुजाता रेखडे यांनी सुरुवातीस पुष्पपरडी देऊन त्या दोघांचे विशेष अभिनंदन केले.

शिबिराच्या पहिल्या सत्रात 'शिक्षण पद्धतीत १० वी पर्यंत परीक्षा घेऊ नयेत' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात शिक्षिका सौ. भारती जळगावकर, कु. अनसूया दिघे, पालक सौ. कल्पना पंडित व श्री. शिरीष बाकरे यांनी आपापली भूमिका मांडली. परीक्षेपुरता अभ्यास हेच सूत्र सोडून ज्ञानवृद्धीसाठी शिक्षण असायला हवे असे वीणा आलासे यांनी सांगितले.

दुसरे सत्र कविसंमेलनाचे झाले. कै. नरेंद्र हजारे यांच्या 'होळी' 'ग्यासोपंत' व 'ऐन पावसात' या कविता त्यांच्या स्नुषा सौ. भारती हजारे यांनी गाऊन दाखवल्या. कमला पालकर यांच्या कविता अंजली पाटोदकर यांनी सादर केल्या. मालिनीबाई मराठे, अरुंधती केतकर, रजनी वैद्य, विकास दिघे, श्रीमती वीणा आलासे व सूर्यकांत कुळकर्णी यांनी कविता प्रस्तुत केल्या. नंतर सचिन दंडवते यांनी दिल्ली, पाटणा, कोलकाता येथील घटनांसंबंधी खिल्ली उडवणारा गद्य-पद्य 'मोरूचा फेरफटका' पेश केला.

''एक यात्रेकरू कंपनी मधुचंद्रासाठी जाणाऱ्यांची सफर आयोजित करते.'' यासाठी अनेकांनी मजेदार कल्पनांच्या जाहिराती लिहिल्या, त्या वाचण्यात आल्या. श्री. सचिन दंडवते व सौ. मुजुमदार यांच्या जाहिरातींना बक्षीसे देण्यात आली.

### श्रोत्यांच्या प्रतिसादामुळे कथाकथनाचा उत्साह टिकून राहिला

अनेक माध्यमांतून माहिती सातत्याने मिळत असते. त्यामुळे व्याख्यानाला लोकांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही, मात्र कथाकथनासारख्या कार्यक्रमाला श्रोत्यांची उपस्थिती चांगली असते. म्हणूनच राज्यभर कथाकथनचे कार्यक्रम करताना आपला उत्साह टिकून राहिला, असे प्रतिपादन विनोदी साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी कुमठे शिक्षण संकुलात कथाकथनाच्या वेळी म्हटले.


## लक्षपूर्वक वाचा...
## यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...

मला त्या बाईचं कौतुक वाटत होतं. सगळ्या माणसांसमोर उभं राहून बोलायचं म्हणजे धाडस लागतंय. आपल्याला साधं शाळेत उभं राहून प्रश्नाचं उत्तर देता येत नव्हतं. भटक्या विमुक्तातली ही बाई आपली बाजू मांडते. सगळे रितीरिवाज मोडून ती बोलत होती. आणि माझ्या शेजारी बसलेल्या भटक्या विमुक्तातल्या इतर बायका-पुरूष तिची टिंगल करत होते.

**तीन दगडाची चूल**

**लेखिका : विमल मोरे** **किंमत : १५० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




प्रा. मिरासदार यांनी यावेळी राजा रणजितसिंगांची संस्कारक्षम कथा सांगितली. ते म्हणाले, आजकाल मोठ्या शहरात देखील व्याख्यानांना लोकांची गर्दी जमत नाही. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांच्यासोबत मी कथाकथनाचे अनेक कार्यक्रम केले. या वयातही आपल्याला कार्यक्रमांना मिळणारा प्रतिसाद पाहून समाधान वाटते. प्रा. विकास वाघ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर प्रा. रमेश आसापुरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवटी नारायण चव्हाण यांनी आभार मानले.

### श्रीपाद जोशी यांना मसाप पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपल्या वर्धापनदिनी ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद जोशी यांचा गौरव केला. पन्नास वर्षांहून अधिक काळ व्रतस्थपणे साधना करणाऱ्या श्रीपाद जोशी यांनी कधी मानमरातब आणि पुरस्कारांची अपेक्षा ठेवली नाही.

ऐन घडणीच्या वयात गांधीवादाचे, आंतरभारतीचे, व्यासंगाचे आणि शुचितेचे संस्कार झाले, ते हृदयात जपत त्यांनी आजवरची आठ दशकांची वाटचाल केली आहे. केवळ लेखनावर चरितार्थ चालविण्याचे कठीण व्रत त्यांनी स्वीकारले आणि आजतागायत आनंदाने निभावले. साने गुरुजींची आंतरभारतीची संकल्पना श्रीपाद जोशी यांच्या रोमारोमात भिनलेली असल्याने दहा-अकरा भाषांचा अभ्यास त्यांनी केला. या अध्ययनातून भाषांतरांची तसेच कोशांची कामे उभी राहिली. त्यांच्या लेखनातही विविधता आहे. दोनशे पुस्तकांच्या संभारात निबंध आहेत, चरित्रे आहेत, कथा आहेत, प्रवासवर्णने आहेत आणि आत्मचरित्रेही आहेत. आत्मचरित्रे म्हणण्याचे कारण असे की श्रीपाद जोशी यांनी 'उलगाउलग' हे अत्यंत पारदर्शी आणि नितळ आत्मचरित्र लिहिले. त्यामुळे आपली बदललेली भूमिकाही त्यांनी अलीकडील काही वर्षांमध्ये ठामपणे मांडली. ती हिंदुत्ववाद्यांना आपलीशी वाटते. श्री. जोशी गांधीवादी असल्याने त्यांची वैचारिक साक्ष काढणे सोयीचेही असेल, पण यात जोशी यांची भावना केवळ स्वत:शी प्रामाणिक राहण्याची असते. खऱ्याखुऱ्या गांधीवादात शारीरिक श्रमाला आणि मितभोगाला महत्त्व असते. त्यामुळेच आज या वयातही नियमित आहाराइतकेच त्यांना सकाळच्या फिरण्याचेही महत्त्व वाटते. उत्तम प्रकृती, आनंदी स्वभाव आणि सतत कामात राहण्याची आवड यामुळे जोशी यांनी आपले आयुष्य हे विचारयात्रेसारखेच आनंदयात्राही बनवले आहे.

### लोकप्रिय 'आभाळमाया' मालिका बंद होणार?

गेल्या दोन वर्षांपासून लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या 'आभाळमाया' मालिकेचे प्रक्षेपण १७ ऑगस्टपासून थांबविण्याचा निर्णय 'अल्फा-मराठी' वाहिनीने घेतला आहे. या निर्णयाबाबत मालिकेच्या निर्मात्यांनी नाराजी व्यक्त केली असली, तरी प्रेक्षकवर्गाच्या वाढत्या नाराजीमुळेच 'अल्फा'ला हा निर्णय घ्यावा लागल्याचे समजते. १५ ऑगस्ट १९९९ रोजी 'अल्फा' वाहिनीचा प्रारंभ झाला होता. या वाहिनीला लोकाश्रय तसेच आर्थिक पाठबळ मिळवून देण्यात 'आभाळमाया' मालिकेचा सिंहाचा वाटा होता. ही मालिका प्रारंभीपासून टीआरपीमध्ये (टेलिव्हिजन रेटिंग पॉईंट) आघाडीवर होती. मात्र, गेल्या काही महिन्यांमध्ये कथानकातील नावीन्य संपल्याने या मालिकेच्या 'टीआरपी'मध्ये घसरण झाली होती.

## पसायदान ही वैश्विक प्रार्थना

स्वत:साठी केलेली ती याचना तर दुसऱ्यासाठी केलेली ती प्रार्थना असते. त्याच अर्थाने पाहिले असता पसायदान ही वैश्विक प्रार्थना आहे, असे कवी लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी म्हटले.

सोलापूरच्या विणकर सभागृहामध्ये महाकवी कालिदास दिनानिमित्त 'गाणे पावसाचे' या विषयावर सोलापुरातील नामवंत कवींचे काव्यवाचन आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी दत्ताजी हलसगीकर होते. कार्यक्रमाचे उद्घाटन करताना बोल्ली म्हणाले की, लावण्याची नव्हाळी म्हणजे कविता होय. मुक्तछंद म्हणजे छंदमुक्त नव्हे. तिलाही आकृती आहे. कवितेला शब्दसौंदर्य, नादसौंदर्य, भावसौंदर्य, अर्थसौंदर्य व चित्रमयता आणि नाट्यमयता हवी. त्याशिवाय ती कविताच होऊ शकत नाही. कविता आपली वाटली पाहिजे, कवितेतून वैश्विक सत्याची प्रचीती यायला हवी म्हणजे तीच कविता खरी वाटते.

अध्यक्ष दत्ता हलसगीकर यांनी मेघदूतातल्या सौंदर्य स्थळांचा मागोवा घेतला. ज्या देशात कवींचा सन्मान होतो तोच देश खरा भाग्यवान. माणसांनी प्रत्येक बाबतीत हिशेबी राहून चालत नाही. माणसाने उत्कटपणे जगावे, झोकून द्यावे, बेहिशेबी व्यवहार करावे, त्याशिवाय जीवनाचा खरा अर्थच कळत नाही. खरेपणाने जगा हाच मेघदूताचा संदेश आहे, असे त्यांनी सांगितले.

## चारोळीने कविता सोपी केली

कवितेत ताकद असेल, आशयघनता असेल तर ती चार ओळींची आहे की चाळीस ओळींची हा भाग दुय्यम ठरतो. चारोळीने कविता सोपी केली, हे सत्य मात्र सर्वांनाच मान्य करावे लागेल, असे प्रतिपादन कवी ज्ञानेश वाकुडकर यांनी केले. सुमती वानखेडे यांच्या 'मनोमनी' या चारोळी संग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. नागपूरच्या प्रवाह आर्ट अकादमीतर्फे पांडे लेआऊट सांस्कृतिक सभागृहात हा कार्यक्रम झाला.

डॉ. मुनघाटे म्हणाले, चारोळी ही अणुशक्तीसारखी असते. चार ओळीतही प्रचंड आशय साठलेला असतो. सुमती वानखेडे यांनी नेमक्या शब्दात भावना मांडल्या आहेत. या चारोळ्यांमध्ये


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

'सप्तपदी हे रोज चालते' असा नवेपणा, ताजेपणा नित्य हवा असेल तर त्यासाठी सासूनं केलेली निगराणी, घातलेलं खतपाणी, काढून टाकलेली कीड आणि योग्य छाटणी अत्यावश्यक असते. म्हणूनच 'शतजन्मीचे नाते' प्रथम सासूशी जोडता आलं तर जोडावं...नवऱ्याशी मग ते आपोआप जुळलं जातं.

**शोध सुखाचा**

**लेखिका : संजिवनी वाडेकर** **किंमत : ८० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




स्वप्न आणि वास्तवही आहे. संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. डॉ. ईश्वर नंदपुरे यांनी प्रास्ताविक केले.

## प्रचंड मानसिक बळ म्हणजे पद्मजा फाटक— विजय तेंडुलकर

'पद्मजा फाटक यांच्यावर आकस्मिक अरिष्ट कोसळले आणि ते तिने तितक्याच मानसिक सामर्थ्याने झेलले, पण ते झेलताना कुठल्याही संकल्पनेचा आधार न घेता आत्मप्रणालीने तिने वेगळ्या दृष्टीने जग पाहण्याचा प्रयत्न केला. हे तिचे मानसिक बळ ती विवेकवादी आहे हे सिद्ध होते.' असे उद्गार ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी 'अक्षर प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या पद्मजा फाटक यांच्या 'हसरी किडनी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना काढले. याप्रसंगी अनंत भावे, सरोजिनी वैद्य, डॉ. राजेंद्र बर्वे, अभिनेते दिलीप प्रभावळकर उपस्थित होते.

सुरुवातीला अनंत भावे म्हणाले की, पद्मजा फाटक ही सदोदित हास्य-विनोद यांच्याशी मैत्री करणारी लेखिका होती. पुढे तिच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या, डॉक्टरांनी तिला डायलॅसिसद्वारे रक्तपुरवठा केला. इतके असूनही जीवनात जगताना सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे ती पाहत आली. हे तिचे खरे सामर्थ्य आहे. या भीषण आजाराला तिने हसत-हसत तोंड दिले हे विलक्षण आहे.

डॉ. सरोजिनी वैद्य यांनी फाटकांच्या विविध वाङ्मय प्रकारांचा संदर्भ देत, तिचे विविध विषयांबद्दल असणारे कुतूहल, स्त्रियांबद्दलची उत्कटता, पीडित लोकांबद्दलची आपुलकी, ही वैशिष्ट्ये दाखविली. अभिनेते प्रभावळकर यांनी पद्मजा फाटक यांनी पाठविलेल्या पत्रांचे वाचन केले.

डॉ. राजेंद्र बर्वे म्हणाले की, दैनंदिन जीवनातील फाटकांचे सहज जगणे आश्चर्यकारकच आहे. आज समाजात रुग्ण म्हणून डॉक्टरांनी त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. दुर्दैवाने वैद्यकीय क्षेत्रातील मानवीपणा नष्ट होत चालला आहे, अशी खंत व्यक्त केली.

पद्मजा फाटक यांनी अमेरिकेहून या कार्यक्रमासाठी ध्वनिफितीतून शुभेच्छा पाठवल्या होत्या.

## परिस्थितीशी झगडणाऱ्या स्त्रीचे अस्तित्व ललित साहित्यात : डॉ. जहागीरदार

ललित साहित्यात परिस्थितीशी झगडत स्वत:चे अस्तित्व निर्माण करणारी ग्रामीण स्त्री प्रामुख्याने आढळते, असे मत ज्येष्ठ लेखिका डॉ. विजया जहागीरदार यांनी व्यक्त केले.

बार्शी येथील मराठी साहित्य मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या सौ. शोभाताई सोपल स्मृती व्याख्यानमालेत 'ललित साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे चिंतन' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. सौ. प्रमिला देशमुख ह्या होत्या.

ललित साहित्याने ग्रामीण स्त्रीला दुर्लक्षिले नाही. तिच्या भोवतालचे सामाजिक वास्तव रेखाटत तिच्यासमोर असलेली कौटुंबिक व सामाजिक आव्हाने ती कशी परतवून टाकते, असे सांगून डॉ. जहागीरदार म्हणाल्या की, स्त्रीच्या मूक भावनांना साद घालत तिच्या व्यक्तिमत्त्वाची सोशिकता व प्रसंगी पहाडालाही टक्कर देईल असा कणखरपणा हे गुण विशेष ललित साहित्यांमध्ये अंतर्भूत झाला आहे.

लौकिक अर्थाने मिळणारे चार भिंतींच्या आतले पुस्तकी शिक्षण मिळण्यातून ग्रामीण स्त्री वंचित राहिली आहे. पण निसर्गाच्या अधिक जवळ असल्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अंगभूत गोडवा आहे. त्याचप्रमाणे स्त्रीचे दुय्यमीकरण करणाऱ्या पुरुषी मानसिकतेला तिला

अधिक जवळून सामोरे जावे लागते. त्यामुळे सामाजिक व्यवहाराचे आकलन तिला जास्त आहे, असे डॉ. जहागीरदार यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील स्त्री ही 'मातृत्व भोगू शकणारीच स्त्री खरी परिपूर्ण स्त्री असते' या भावनेचा पगडा असणारी आहे हे मातृत्व मिळविण्यासाठी ती कोणत्याही थराला जाऊन मातृत्वाचा हक्क मिळविते. अशा मातृत्व सुखाला आसुसलेल्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण ललित साहित्यात झालेले आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रा. सौ. प्रमिला देशमुख म्हणाल्या की, स्त्रियांच्या मूलभूत हक्काची जाणीव करून देण्यासाठी ग्रामीण भागात स्त्री मुक्ती चळवळ गेली पाहिजे. त्यासाठी तरुण व तरुणींनी प्रयत्न करायला पाहिजे.

## राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालकपदी डॉ. निर्मलकुमार फडकुले

'राज्य शासनाने आपल्यावर जी जबाबदारी सोपविली आहे, ती मी निष्ठेने पार पाडेन, मराठी भाषेच्या विकासाला चालना देण्यासाठी माझे सर्वतोपरी प्रयत्न राहतील.' अशी प्रतिक्रिया डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी व्यक्त केली.

राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालकपदी नामवंत साहित्यिक, ज्येष्ठ समीक्षक, पट्टीचे वक्ते डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची नियुक्ती करण्यात आली.

उपसंचालकपदी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षा वसुंधरा पेंडसे-नाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. फडकुले यांच्या नियुक्तीचे साहित्यिक वर्तुळातून तसेच अन्य थरांतूनही स्वागत होत आहे.

मुख्यमंत्री व सांस्कृतिक विभागाचे मंत्री राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्ष व संचालकांची नियुक्ती करतात. मराठी भाषेसाठी कार्य करणारी राज्यातील ही प्रातिनिधिक संस्था आहे. मराठी भाषा व संस्कृतीच्या विकासासाठी ही संस्था काम करीत असते. विविध पुस्तकांचे प्रकाशन, मराठी व अन्य भाषांशी संबंध याचा विचार ही संस्था करीत असते. विविध समाजसुधारक, धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, ग्रंथ यांचे संशोधन व प्रकाशनाची संस्थेची योजना आहे. भाषेच्या विकासासाठी काही पुस्तके लिहून घेतली जातात. गेली दहा वर्षे ही संस्था कार्यरत आहे. डॉ. फडकुले हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक असून, त्यांनी समीक्षात्मक व वैचारिक विपुल लेखन केले आहे. ते पट्टीचे वक्ते म्हणून ओळखले जातात. त्यांचे आनंदाची डहाळी काही रंग काही रेषा, चिपळूणकरांचे तीन निबंध, संत कवी तुकाराम : एक चिंतन, प्रबोधनातील पाऊलखुणा, लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व, हिरव्या वाटा, ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला आदी साहित्य प्रसिद्ध झाले आहे. डॉ. फडकुले यांच्या 'हिरव्या वाटा' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. येथील संगमेश्वर महाविद्यालयात त्यांनी मराठी विभाग प्रमुख म्हणून तसेच शिवाजी विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्य केले आहे.

श्रीमती वसुंधरा पेंडसे नाईक यांनी 'लोकसत्ता'च्या सहसंपादक आणि नवशक्तीच्या संपादक म्हणून काम केले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्या म्हणूनही पेंडसे-नाईक यांनी काम केले आहे.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

उंचीवरच्या माणसाची हीच शोकांतिका. उंचावरून जास्त प्रदेश दिसतो. माणूस मग निव्वळ स्वता:त गुरफटत नाही. 'विश्वचि माझे घर' अशी त्याची अवस्था होते. स्थापन केलेल्या विक्रमामुळं आणि गाठलेल्या उंचीमुळं जितक्या माणसांच्या नजरा त्या माणसाकडे वळतात, त्यापैकी प्रत्येकाच्या डोळ्यातील भूक, गरज, जगण्याचा आटापिटा हे सगळं त्या माणसाला दिसायला लागतं.

**माझं माझ्यापाशी** **लेखक : व. पु. काळे**

**किंमत : १०० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




## हॅरी पॉटर पुन्हा बेस्ट सेलर!

हॅरी पॉटर आता आवाज करू लागला असून त्याचे चाहते त्यामुळे आता खुश झाले आहेत; पण झोप उडाली आहे ती या चाहत्यांच्या पालकांची. कारण हॅरी पॉटरची कादंबरी मोठ्याने ऐकण्याची सोय झाल्याने मुलं ती सक्तीने आपल्या पालकांना ऐकवू शकतात.

प्रख्यात विनोदवीर स्टिफन फ्राय यांनी 'हॅरी पॉटर अँड द गॉब्लेट ऑफ फायर' ही कादंबरी वाचली असून त्यातून २१ तासांची ध्वनिफित तयार झाली आहे. आपल्या छापील कादंबऱ्यांतून विक्रीचा विक्रम निर्माण करणाऱ्या या कादंबरीने ध्वनीफितबद्ध आवृत्तीचाही विक्रम निर्माण केला आहे. गेल्या चार वर्षात जे. के. रॉलिंग यांच्या हॅरी पॉटर मालिकेतील चारही कादंबऱ्यांच्या ४३ भाषांतून नऊ कोटीहून अधिक प्रती विकल्या गेल्या आहेत.

## महावीर जोंधळे यांना आचार्य विद्यानंद मराठी साहित्य पुरस्कार

माणसाला माणूस बनविणाऱ्या शिक्षणातून सांस्कृतिक क्रांतीची आज समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी दक्षिण भारत जैन सभेच्या ८१ व्या त्रैवार्षिक अधिवेशनात विविध पुरस्कारांचे वितरण करताना म्हटले. वस्त्रोद्योग राज्यमंत्री प्रकाश आवाडे, ग्रामविकास मंत्री आर. आर. पाटील, आ. हाफिज धत्तुरे, महापौर सुरेश पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी या वेळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार कल्लाप्पा आवाडे होते.

लोकमतच्या औरंगाबाद आवृत्तीचे संपादक महावीर जोंधळे यांना 'आचार्य विद्यानंद' मराठी साहित्य पुरस्कार देण्यात आला. एच. एस. मदनकेसरी यांना कन्नड साहित्य पुरस्कार तसेच मुरदेवी पाटील, पद्मावती खेमलापुरे, पायगोंडा पाटील व प्रकाश बाबासाहेब पाटील यांनी विविध पुरस्कार देण्यात आले.

महावीर जोंधळे म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या धुरिणांनी केलेल्या शैक्षणिक क्रांतीमुळे काही विधायक काम करता आले. शाहू महाराज आणि अण्णासाहेब लठ्ठे

यांचे काम जवळून पाहण्याची उर्मी उराशी होती. माणूस म्हणून जगण्याचे व इतरांना सोबत घेऊन जाण्याचे काम यापुढे करावे लागेल. देशात लोकशाही असली तरी आता संगणकशाहीचा काळ आपल्यापुढे आहे. त्यादृष्टीने पावले टाकावी लागतील.

स्वावलंबी शिक्षणातून परिवर्तन हा विचार कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिला. माणसाच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू शिक्षणच आहे हे कर्मवीरांनी ओळखले होते, असे सांगून डॉ. पतंगराव कदम म्हणाले की, सुशिक्षितांनी भगवान महावीरांच्या अहिंसा तत्त्वज्ञानाची सांगड शिक्षण व्यवस्थेशी घातली तर खरी क्रांती होईल. समाजातील मोठा घटक ज्या स्त्रिया आहेत त्या शिक्षणामध्ये खूप मागे पडल्या आहेत. त्यांच्या सर्वांगीण उन्नतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कर्मवीरांनी दिलेला शिक्षणाचा वसा घेऊन शिक्षण आणि उद्योगाची योग्य सांगड घातली तर मानवी विकासाच्या कक्षा रुंदावल्याशिवाय राहणार नाहीत, असेही ते म्हणाले.

वस्त्रोद्योग राज्यमंत्री प्रकाश आवाडे म्हणाले की, भगवान महावीरांनी दिलेल्या अनेकान्त, अपरिग्रह आणि अहिंसा या तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन शिक्षणातून परिवर्तनाचे काम जैन समाजाला करावे लागेल.

या वेळी डॉ. श्रीमती देजम्मा, शांताप्पाण्णा मिरजी, माणिकचंद शिवलाल शहा, डॉ. जे. जे. मगदूम यांना कर्मवीर भाऊराव पाटील समाजसेवा पुरस्कार देण्यात आला.

खुल्या अधिवेशनाच्या सत्रात द. भा. जैन सभेच्यावतीने विविध ठराव करण्यात आले. ते असे – राखीव जागांचा वापर करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण द्यावे. त्यासाठी विविध शिबिरे आयोजित करावी जैन सभेच्या कामासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यासाठी त्यासाठी प्रयत्न करावेत. जैन धर्मीयांचा अल्पसंख्यांकामध्ये प्रवेश करण्याच्यादृष्टीने अल्पसंख्यांक आयोगावर नियुक्त करण्यात आलेल्या बाळ पाटील यांनी प्रयत्न करावेत. शिवाजी विद्यापीठात तत्त्वज्ञान संशोधन केंद्र सुरू करण्यात यावे. ठिकठिकाणी संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात यावेत.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

एक सूर्यफूल असतं. ज्याला सदैव प्रकाशाचा ध्यास असतो. पण एके दिवशी अचानक त्याला समजून येतं की, खरा प्रकाश त्याच्या अंतरंगात आहे. त्यावेळी आपसूकच त्याचा शोध अंतरंगापासून नव्याने सुरू होतो.... अंजनीची स्थितीही अशीच होती.

**कांचनगंगा** **लेखिका :माधवी देसाई**

**किंमत : १५०रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




## भारतीय स्वातंत्र्य सैनिक– पुस्तकाचे प्रकाशन

'देशातील कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याने स्वातंत्र्य सैनिकांना सर्वाधिक मानधन (पेन्शन) दिले आहे,' अशी माहिती राज्याच्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सभापती विजयेंद्र काबरा यांनी दिली.

अखिल भारतीय स्वतंत्रता संग्राम सेनानी समितीच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य सैनिक परिचय, पुणे जिल्हा या पुस्तकाचे प्रकाशन आणि स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार श्री. काबरा यांच्या हस्ते झाला, त्या वेळी ते बोलत होते.

तुरुंगवास भोगलेल्या स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणेच भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांनाही तितकेच मानधन मिळाले पाहिजे, हा मुद्दा मांडताना श्री. काबरा म्हणाले, ''महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य सैनिकांसाठी भरीव निधी दिला आहे. या उलट काही राज्यांत असूनही स्वातंत्र्य सैनिकांना मानधन दिले जात नाही. मला जेवढे नि:पक्षपातीपणे व न्याय्य बुद्धीने काम करता येईल, तेवढे करण्याचा मी प्रयत्न करीन. कोणावर अन्याय होणार नाही हे कटाक्षाने पाहीन, पण त्याच वेळी शासनाच्या पैशाचा दुरुपयोग होऊ देणार नाही. आज स्वातंत्र्य सैनिकांनी रचनात्मक, सुधारणावादी कार्य करण्याची गरज आहे.''

''आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. तो रोखण्याचे काम स्वातंत्र्य सैनिकांनी केले पाहिजे,'' अशी अपेक्षा 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांनी व्यक्त केली. स्वातंत्र्य सैनिक मग तो कुठल्याही चळवळीतील असो. त्यांना समान सन्मान, समान मानधन व समान सुविधा द्याव्यात. १९४७ मध्ये ज्यांचे वय सोळा वर्षांपेक्षा कमी होते त्यांना स्वातंत्र्य सैनिक मानू नये आदी ठराव मंजूर करण्यात आले.

कार्यक्रमास ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व विचारवंत बाळासाहेब भारदे, स्वतंत्रता संग्राम सेनानी समितीचे अध्यक्ष डॉ. न. म. चिल्लाळ, कार्याध्यक्ष प्रकाश शहा, लतीफ मागदूम आदी उपस्थित होते.

## टिळक-सावरकरांचे समूहशिल्प

इंग्रजी कापडाची होळी करतानाचे लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे समूहशिल्प पुण्यात उभारण्यात येणार आहे.

या समूहशिल्पाची उभारणी करण्यासाठी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. डॉ. श. ना. नवलगुंदकर यांच्यासारख्या तज्ज्ञांचा त्यात समावेश आहे. या समूहशिल्पाच्या मातीच्या रचना तयार आहे. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबरोबर अन्य पुणेकर नागरिक इंग्रजी कापडाच्या होळीच्या समूहशिल्पात आहेत.

ब्राँझमध्ये तयार करण्यात येणाऱ्या या समूहशिल्पाची उभारणी प्रसिद्ध शिल्पकार संजय परदेशी करीत आहेत. त्यासाठी ११ लाख २० हजार रुपये खर्च येणार आहे. कर्वे रस्त्यावर यशवंतराव चव्हाण पुलाजवळ त्याची उभारणी करण्यात येणार आहे. हे समूहशिल्प व्हावे यासाठी राजा मंत्री यांनी प्रयत्न केले होते. भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष नगरसेवक अनिल शिरोळे यांनी या विषयाचा पाठपुरावा केला होता. या सगळ्यांच्या प्रयत्नातून हे शिल्प तयार होत आहे.

## 'वास्तवाचा अभ्यास करून होणारे लिखाण समाजपोषक'

''वास्तवाचा अभ्यास करून केले जाणारे लिखाण समाजाला पोषक ठरते,'' असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी केले.

मारुती यादव यांनी लिहिलेल्या 'गुंता' या कादंबरीचे प्रकाशन यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे होते, तर बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी प्रमुख पाहुणे होते. 'अनुराधा प्रकाशन'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

वादळ निर्माण करणारी ही कादंबरी आहे, असे सांगून दीक्षित म्हणाले, ''मानवी संबंधांतील विविध रूपे लेखकाने प्रभावीपणे मांडून अश्रूंची जाणीव करून दिली आहे.'' आत्मनिवेदनावर भर देऊन कथानक गुंफण्यात यादव यांना यश आले आहे. सामाजिक समस्येवरील ही कादंबरी वाचकांची उत्सुकता वाढवते.

कुलकर्णी यांनीही 'गुंता' वाचून प्रभावित झाल्याचे सांगितले. ''जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आशादायी असावा, या विचाराने व आईच्या संस्कारांमुळे मी हे लिखाण केले,'' असे कादंबरीचे लेखक यादव यांनी स्पष्ट केले.

## चांगल्या कविता लिहिण्याची जबाबदारी

''माणसांना जोडण्याचे सामर्थ्य कवितेमध्ये असते. हे नाते अधिक दृढ होण्यासाठी चांगल्या कविता लिहिण्याची जबाबदारी नवकवींनी स्वीकारली पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या नवोदित मराठी साहित्य संमेलनात 'माझ्या कवितेची धूळपाटी' या विषयावर झालेल्या परिसंवादात ते बोलत होते. गंगाधर महांबरे, लक्ष्मीनारायण बोल्ली, डॉ. सुहासिनी इर्लेकर, उद्धव कानडे इत्यादी कवींनी या वेळी आपले अनुभव सांगितले.

श्री. सुर्वे म्हणाले, ''सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव व विषयाची योग्य दखल घेऊन मी कविता लिहितो. माझ्या मनात प्रथम कविता तयार होते व नंतर ती कागदावर येते. भोगलेल्या कष्टांचा, आलेल्या अनुभवांचा त्यात उच्चार आहे. लिहायला सुचणे ही प्रक्रिया असून माणूस संवेदनक्षम आहे, तोपर्यंत कवितेचे अस्तित्व टिकून राहील. जीवनात आनंदी राहण्यासाठी कवितेशी नाते जोडले पाहिजे.''

''कविता लिहिण्यासाठी राष्ट्रसेवा दलाचे संस्कार महत्त्वाचे ठरले, असे सांगून श्री. महांबरे म्हणाले, ''कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्यापासून मिळालेली प्रेरणा माझ्या जीवनात उपयुक्त ठरली. कवींनी आपण लिहिलेल्या कविता परत पाहाव्यात. हे अनुभव पुढील कविता लिहिण्यासाठी उपयुक्त ठरतात.''

''आपण तेलगू असलो तरी ज्ञानेश्वरांच्या ओव्या वाचून मराठीकडे आकर्षित झालो.'' हे सांगून श्री. बोल्ली म्हणाले, ''मी तेलगू रचनांचे मराठीत अनुवाद केले आहेत. बोरकरांच्या कवितांनी प्रभावित होऊन मराठीमध्ये लिहिण्याची ईर्षा माझ्यामध्ये निर्माण झाली.''

खरा कवी मनात बेचैन असतो, असे डॉ. इर्लेकर यांनी सांगितले. ''कवी सतत नवे शोधण्याचा प्रयत्न करतो. आपोआपच घडावे लागते. ते तयार करता येत नाही.''


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

कोणत्या मानवी हातांनी हा राक्षसी दगड प्रथम खाणीतून काढला ? कोणत्या भयानक शक्तींनी तो उलटा केला? कोणत्या पाशवी शक्ती इथे काम करीत होत्या? आणि का? या गोष्टींचा विचार करीत तिथे फिरत असतानाच अर्ध्या मैलावरील पर्वतावरील खडक वितळून पाझरला आहे असे लक्षात येते. अशी खडक वितळण्याची क्रिया फक्त अतिप्रखर उष्णतेने होऊ शकते.

**देव?छे! परग्रहावरील अंतराळवीर!**

**लेखिका : बाळ भागवत** **किंमत : १०० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.




## पत्रकारितेची विश्वासार्हता धोक्यात : प्रा. अरुण साधू

भारतातील पत्रकारितेची विश्वासार्हता धोक्यात आली असल्याची खंत, पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे मावळते प्रमुख प्रा. अरुण साधू यांनी व्यक्त केली.

विभागप्रमुख पदावरून प्रा. साधू नुकतेच निवृत्त झाले. त्यानिमित्ताने 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते त्यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. त्याला उत्तर देताना ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल माविनकुर्वे, विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी एम. एस. जाधव, नूतन विभागप्रमुख डॉ. केवलकुमार आदी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

इंटरनेट पत्रकारिता या विषयावर विभागाने मध्यंतरी कार्यशाळा घेतली होती. तीमधील चर्चेची पुस्तिका 'सकाळ'च्या सहकार्याने तयार करण्यात आली आहे. तिचे या प्रसंगी श्री. माविनकुर्वे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

प्रा. साधू म्हणाले, ''पत्रकारांच्या लेखणीला एकेकाळी असेलला मान आता कमी झालेला आहे. पत्रकारांची विश्वासार्हता रसातळाला पोचली आहे. याची अनेक कारणे आहेत. आपल्याकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पत्रकारितेचा व्हावा तेवढा विकास झाला नाही. पत्रकारांनीही या बाबींकडे दुर्लक्ष केले.''

पत्रकार, लेखक म्हणून प्रा. साधू मोठे आहेत; तसेच शिक्षक म्हणूनही त्यांनी मोठी कामगिरी केली, असे दीक्षित यांनी नमूद केले. माध्यमांची ताकद समजून घेऊन ती विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे कार्य प्रा. साधू यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. प्रसन्नकुमार अकलूजकर, प्रा. उज्ज्वला बर्वे, अभय कुलकर्णी, श्री. माविनकुर्वे, यांनीही या वेळी विचार व्यक्त केले. इंटरनेट पत्रकारितेच्या पुस्तिकेबद्दलची माहिती डॉ. किरण ठाकूर यांनी दिली.

## भांडारकर संस्थेतील हस्तलिखिते

डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी हस्तलिखितांच्या अव्यवस्थेसंबंधी नाराजी व्यक्त केली आहे.

या संस्थेत हस्तलिखिते मोठ्या प्रमाणात आहेत. त्यापैकी आठ हजारांहून अधिक हस्तलिखितांच्या नोंदी झालेल्या नाहीत. त्यामुळे ही हस्तलिखिते गेली दोन वर्षे अभ्यासकांना उपलब्ध होऊ शकलेली नाहीत, याविषयी नाराजी व्यक्त करण्यात आली. या ग्रंथालयाच्या इमारतीतच प्रकाशन विभागही आहे. हा विभाग स्वतंत्र इमारतीत हलविण्याची चर्चा १९९४ पासून सुरू आहे. ही इमारत तयारही आहे. त्यामुळे आता प्रकाशन विभाग स्वतंत्र इमारतीत हलवून ग्रंथालयाची इमारत पूर्णपणे ग्रंथालयासाठीच वापरण्याचा निर्णय झाला.

कर्मचाऱ्यांनी पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार वेतन मिळावे, अशी मागणी केली. त्यासाठी लाक्षणिक उपोषण व निदर्शने या स्वरुपाचे आंदोलनही केले. याप्रकारे वेतन देण्यास संस्थेने असमर्थता दर्शवली व दोन वेतनवाढी देता येतील, असे सांगितले. मात्र हा निर्णय कर्मचाऱ्यांनी मानला नाही.

## कर्तृत्ववान पिढी तयार करणारे साहित्य निर्माण व्हावे : शरद पवार

''जागतिकीकरणाच्या या काळातील स्पर्धेत कर्तृत्ववान पिढी तयार करण्यासाठीच साहित्य निर्माण केले पाहिजे,'' अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली.

यशवंतराव चव्हाणनगरीत भरविलेल्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते.

श्री. पवार म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या या काळात सर्व क्षेत्रांत वेगाने बदल होत आहेत. तंत्रज्ञानाचा प्रचंड विकास होतो आहे. मराठीतील कर्तृत्व दुनियेला दाखविण्याची संधी आपल्याला मिळाली आहे, अशी नोंद या बदलातून घ्यायला हवी. मात्र, काही मंडळींनी वेगळ्या वाटेने जाण्याचे, संकुचित विचार देण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे मनं घडविण्याची प्रक्रिया बंद पडेल. ज्योतिषाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. नव्या पिढीच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होईल. ती कर्तृत्वशून्य होईल. शिक्षणाचा उपयोग आत्मविश्वास वाढविण्याऐवजी बाह्य गोष्टींवर विसंबून राहण्यासाठी होईल. कर्तृत्वाने उभे राहण्याऐवजी समाजाचा आत्मविश्वास डळमळीत करण्याची वृत्ती ज्योतिषशास्त्राने बळावेल. विज्ञानाची कास सोडून भलत्याच मार्गाचे शिक्षण विघातक ठरेल. हे शास्त्र शिक्षण व साहित्याच्या माध्यमातून देण्याचे घाटत असेल व त्याला राजमान्यता मिळत असेल, तर हे गंभीर संकट मानले पाहिजे. हे सर्व टाळण्यासाठी विशुद्ध, व्यापक विचारांचा प्रसार व प्रचार करणारे साहित्य निर्माण व्हायला पाहिजे. त्याची निर्मिती करणाऱ्यांना ताकद व प्रोत्साहन समाजाने द्यायला हवे.''

''समाज साहित्य, समाज साहित्य, संस्कृती व संगीतात किती रस घेतो यावर त्या समाजाची खऱ्या अर्थाने उंची वाढवायची असेल, तर लिखित वाङ्मयाला प्रतिष्ठा प्रोत्साहन द्यायला हवे. अलीकडच्या काळात मराठी साहित्यात भर घालण्याचा मक्ता पुण्या-मुंबईकडे राहिलेला नाही; तो ग्रामीण भागाकडे आला आहे, ही स्वागतार्ह बाब आहे,'' असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य बोराडे म्हणाले, ''प्रदूषणाने वेढलेल्या, खाचखळग्यांनी भरलेल्या वाटेने सध्या वाङ्मयीन वाटचाल सुरू आहे. आमच्या पिढीच्या वेळी लेखनासाठी पोषक वातावरण होते. प्रसिद्धीसाठी प्रकाशकांची दारे झिजवावी लागत नव्हती. आता परिस्थिती उलट आहे. आपले लेखन कोठे व कसे प्रसिद्ध करावे, या चक्रात नवोदित साहित्यिक पालकत्व स्वीकारण्याचा निर्णय मी घेतला आहे. त्यानुसार, मी सात नवोदित कवी व लेखकांशी लेखन व वाचनाबाबत चर्चा करीन. त्यांचे साहित्य प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्न करीन. हे लेखक खंबीरपणे स्वत:च्या पायावर उभे राहीपर्यंत त्यांचे साहित्यिक पालकत्व माझ्याकडे असेल.''

या प्रसंगी श्री. बोराडे यांनी मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय जाहीर केला. नवोदित लेखकांच्या हस्तलिखितांवर अभिप्राय देण्यासाठी विद्यापीठ परीक्षांच्या धर्तीवर मूल्यांकन केंद्रे स्थापन करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, ''नवोदित मराठी साहित्यिकांनी यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यप्रेमी कलारसिकतेचा अभ्यास केला पाहिजे. बहुजन समाजामध्ये केवळ राजकीय महत्त्वाकांक्षाच नव्हे; तर साहित्य, शास्त्र, कला आदी सर्व प्रांतांत चमकण्याची इच्छाशक्ती वाढली पाहिजे. समाजाला विधायक विचार दिले पाहिजेत. चांगल्या विचारांतून चांगले कर्म, चांगल्या कर्मांतून चांगला स्वभाव, त्यातून चांगले चारित्र्य व अखेर त्यातून चांगले प्रारब्ध निर्माण होते, हे लक्षात घ्यायला हवे.''

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर म्हणाले, ''वैज्ञानिक प्रवाहाचा समाजाशी व वाङ्मयाशी निकटचा संबंध असतो. त्याचे परिणाम अनेक वर्षांनी दिसून येतात. अमेरिकेत यादवी माजली त्याच वेळी तेथे वैज्ञानिक प्रगतीही होत होती. त्याचे परिणाम कालांतराने जगाला समजले. १९३० मध्ये सी. व्ही. रामन यांना नोबेल पारितोषिक मिळाले. त्यानंतरच्या काळात घडलेल्या वैज्ञानिक प्रगतीचे प्रतिबिंब आपल्या साहित्यात उमटलेले कोठे दिसत नाहीत. वेळ व अंतरातील संकोचाची परिमाणे आता कमी होऊ लागली आहेत. नवोदित साहित्यिकांनी या


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

''त्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळं तुम्ही चिरडून जाणार आहात. कामगार संघटनेला त्याने सुरुंग लावला आहे.कामगारांच्या कल्याणासाठी आपला जन्म आहे, अशी जी उदात्त भूमिका त्यानं घेतली आहे, ती निव्वळ तुमची फसवणूक आहे. ''

**फॅक्टरी गेट**

**लेखक : रंगा मराठे** **किंमत : १५० रु.**

या बाबतची स्पर्धा सप्टेंबरच्या अंकात दिली जाईल.

बदलाचे भान राखले पाहिजे.''

### ब्रिटिश लायब्ररीत माहिती तंत्रज्ञान विभता

ब्रिटिश कौन्सिल पुणे लायब्ररीने माहिती तंत्रज्ञान विषयावरील पुस्तके, नियतकालिके आणि सीडीज् यांचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. लायब्ररीच्या सभासदांना या सुविधेचा लाभ घेता येईल, असे व्यवस्थापक श्रीमती अनिल बक्षी यांनी सांगितले. तरुण पिढी आणि व्यावसायिक यांना या विभागाचा अधिक फायदा होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. अधिक माहितीसाठी ९१७/१, फर्ग्युसन कॉलेज रोड, दूरध्वनी : ५६५४३५१ किंवा blo pune at in.britishcouncil.org येथे संपर्क साधावा.

### 'गदिमा डॉट कॉम' सीडीचे प्रकाशन

ग. दि. माडगूळकरांवरील 'गदिमा डॉट कॉम' या सीडीचे प्रकाशन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाले.

गदिमांचे नातू सुमित्र माडगूळकर यांनी ही सीडी तयार केली आहे. 'मंतरलेले दिवस', 'वाटेवरल्या सावल्या', 'हॅलो मिस्टर डेथ' ही गदिमांची गाजलेली पुस्तके; 'वैशाखी' हा चित्रपटगीतसंग्रह, 'गीतरामायण', 'पूरिया', 'जोगिया' हे काव्यसंग्रह या सिडीवर आहेत. १२५ चित्रपटगीते, 'गीतरामायण', 'गीतगोपाल', यांसह गदिमांचे 'मी कसा झालो,' हे भीषण या सीडीवर उपलब्ध आहे. 'गदिमा' हा लघुपट, त्यांची दुर्मिळ छायाचित्रे ही सीडीची इतर वैशिष्ट्ये आहेत. भारतीय भाषांतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग असल्याचा दावा सुमित्र माडगूळकर यांनी केला आहे.

### आता क्रमिक पुस्तकांचाही विमा

वस्तूंची चोरी झाली, अंशत: अथवा पूर्णत: हानी झाली तर त्याबद्दल विम्याच्या रूपात नुकसानभरपाई मिळू शकते. कर्नाटकात ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने आता पाठ्यपुस्तकांच्या विम्याचीही अभिनव योजना सुरू केली आहे. अपघातात विद्यार्थ्यांची पुस्तके हरवली, मुलगा जखमी झाला किंवा त्याला अपघातामुळे परीक्षा देता आली नाही, तर विमा कंपनी त्याच्या पुस्तकाची किंमत तसेच परीक्षा शुल्क देते.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

माझ्या आसारीतल्या दोऱ्याचा एक भाग तू !
तो दोरा आकाशात उडवायचा की
स्वत:भोवती गुंडाळून घ्यायचं जखडून स्वत:लाच
हे तुझ्या मर्जीवर!
हे घे, मी माझ्या स्वप्नांचा एक भाग विनाअट तुला दिला !

**निर्बाचित कविता**

**लेखिका : तसलिमा नासरिन** **अनु. : मृणालिनी गडकरी**

**किंमत : ७० रु.**




### आत्मबळ जाणून स्त्रीने स्वत:ची प्रगती साधावी : शान्ता शेळके

''पुरुषांशी स्पर्धा आणि संघर्ष हे स्त्रीचे स्वभाववैशिष्ट्य नाही. प्रेम, वात्सल्य, सहानुभूती, करुणा, मातृत्व यांमध्येच स्त्रीचे आत्मबळ आहे. ते जाणून घेऊन तिने स्वत:ची प्रगती साधली पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ कवयित्री शान्ता शेळके यांनी व्यक्त केले. पानकुँवरबाई फिरोदिया स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात, 'स्त्रीस्वातंत्र्याचा खरा अर्थ काय?' या विषयावर त्या बोलत होत्या. कायनेटिक उद्योगसमूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया, डॉ. जयश्री फिरोदिया, रतनलाल कोटेचा आणि शांताबाई कोटेचा या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

रामायणकाळापासून स्त्रियांनी स्वत:मधील शक्ती समाजाला दाखवून दिली आहे, असे नमूद करून शान्ता शेळके यांनी कर्तृत्ववान महिलांची उदाहरणे दिली. त्या म्हणाल्या, ''आता तर पुरुषांनी लादलेली बंधने झुगारून देऊन त्यांच्या बरोबरीने वाटचाल स्त्रिया करीत आहेत; परंतु त्यांनी पुरुषी वृत्तीशी स्पर्धा करू नये. स्त्रीमुक्तीचा हा अतिरेकी मार्ग सोडून द्यायला हवा. सर्व प्रकारच्या कामाच्या बाबतीत स्त्री आणि पुरुष आता एकाच पातळीवर आले आहेत. बौद्धिक पातळीतही स्त्री कोठे कमी नाही हे सिद्ध झाले आहे. मात्र, शारीरिक पातळीवर स्त्री आणि पुरुष यांत साम्य नाही.''

सावित्री, मुक्ताबाई, जनाबाई यांपासून राणी लक्ष्मीबाईपर्यंत अनेक स्त्रियांनी स्त्रीस्वातंत्र्याचा आदर्श घालून दिला आहे, असे सांगून त्या म्हणाल्या, ''कालानुरूप स्त्रियांवर पुरुषांकडून बंधने येत गेली. प्रामुख्याने उच्चवर्णीयांत स्त्रीस्वातंत्र्याचा संकोच होत गेला. बहुजन समाजातील स्त्रियांवर फारशी बंधने नव्हती. इंग्रजांची राजवट आल्यानंतर समाजात स्त्री-पुरुष समानतेचे विचार वाहू लागले. स्त्रियांना शिक्षण दिल्यास आणि अर्थार्जनाचे साधन दिल्यास प्रश्न सुटतील असे वाटले. प्रत्यक्षात वेगळे प्रश्न निर्माण झाले. सुशिक्षित स्त्री-पुरुषांशी स्पर्धा करू लागली. लग्न म्हणजे गुलामगिरी या समजुतीमुळे सुरवातीच्या काळात अनेक सुशिक्षित स्त्रियांनी विवाह टाळले. हळूहळू ही विचारसरणी बदलत गेली.''

''प्रारंभीच्या काळात स्त्रीला देवता मानून लिखाण झाले. मात्र, स्त्री हीदेखील पुरुषासारखीच आहे. तिचेही प्रसंगी स्खलन होऊ शकते याची जाणीव मार्क्स, फ्रॉईड यांच्या तत्त्वज्ञानानंतर होऊ लागली. मग साहित्यातून स्त्रीचे वास्तववादी चित्रण होऊ लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्याकडे अनेक स्त्रिया नोकरीसाठी घराबाहेर पडल्या. त्यानंतर स्त्रीमुक्ती चळवळ आली. या चळवळीने स्त्रियांना अनेक न्याय्य हक्क मिळाले. पुरुष जे करतात ते सर्व करण्याचा अतिरेकी मार्गही काहींनी स्वीकारला. वास्तविक संघर्ष किंवा स्पर्धा हे काही स्त्रीचे वैशिष्ट्य नाही. स्त्री ही स्वतंत्र आहेच; पण पुरुषांशी स्पर्धा म्हणजे स्त्रीस्वातंत्र्य नाही,'' असेही त्यांनी नमूद केले.

## ‘एफ. आय. पी.’च्या उपाध्यक्षपदी अनिल मेहता यांची बिनविरोध निवड

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स ही भारतातील प्रमुख प्रकाशकांची संघटना असून या संघटनेचे सभासद भारतामधील प्रमुख प्रकाशक आहेत. ही संघटना इंटरनॅशनल पब्लिशर्स असोसिएशन, जिनिव्हाशी संबंधित आहे. इंटरनॅशनल पब्लिशर्स असोसिएशन फॉर साउथ एशियाचे कार्यालय पण याच संघटनेद्वारा पाहिले जाते. अशा या भारतातील प्रमुख प्रकाशक संघटनेच्या २८ व्या वार्षिक निवडणुका नुकत्याच दिल्ली येथील हॉटेल कनिष्कामध्ये पार पडल्या.

अध्यक्ष म्हणून श्री. देबा ज्योती दत्ता- कोलकत्ता, उपाध्यक्ष (पश्चिम) म्हणून श्री. अनिल मेहता- कोल्हापूर व पुणे, उपाध्यक्ष (दक्षिण) म्हणून श्री. डी. सी. रवी- कोट्टायम, आणि उपाध्यक्ष (उत्तर) म्हणून श्री. सुरेंद्र घाई- दिल्ली यांची बिनविरोध निवड झाली. याच कार्यकारिणीवर भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील ११ प्रकाशकांची निवड झाली. श्री. अनिल मेहता महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या तीन राज्यांसाठी काम पाहतील.



*एफ. आय. पी. च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी नॅशनल बुक ट्रस्टचे डायरेक्टर (डावीकडील) श्री. निर्मल कांत भट्टाचार्यजी, अनिल मेहता.*



## ‘आपटे वाचन मंदिर’चा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान समारंभ


‘स्त्रीचं आयुष्य गुंतागुंतीचं आहे. स्वत:हून एक वेगळी स्त्री शोधण्याचा मी सतत प्रयत्न केला. माझ्या बहुतेक कथातून स्त्री हाच विषय ठामपणे समोर येतो. इतकेच नव्हे तर मी संपादित केलेल्या पुस्तकांतही स्त्री हाच केंद्रबिंदू आहे.’ असे उद्‌गार प्रसिद्ध लेखिका विजया राजाध्यक्ष यांनी काढले. इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिर व इचलकरंजी साहित्यसंमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार प्रदान समारंभात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

यावेळी उत्कृष्ट गद्य साहित्यकृती म्हणून आंधळ्याच्या गाई- मेघना पेठे, उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी गर्भागार- शंकर रामाणी, लक्षणीय पद्य साहित्यकृती म्हणून अरुणचंद्र गवळींच्या कविता- अरुणचंद्र गवळी व येरू म्हणे- प्रवीण बांदेकर, लक्षणीय गद्य साहित्यकृती म्हणून आठवणींचा मोहर- राजाभाऊ गवांदे व सेतू- आशा बगे या साहित्यकृतींना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात राजाध्यक्ष पुढे म्हणाल्या, ‘ मी प्राध्यापक असल्याचे माझ्या लेखनिक जीवनात महत्त्वाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी माझ्याकडून वाचन करवून घेतले. एखादे पुस्तक विद्यार्थ्यांनी वाचले आहे आणि आपण वाचले नाही असे दडपण माझ्यावर सतत येत राहिले. असे होऊ नये म्हणून मी सतत वाचत राहिले.’ आपल्या लेखनाविषयी बोलताना त्या म्हणाल्या, ‘आपलं आयुष्य नेहमी गजबजलेलं असतं. त्यामुळे कादंबरी लिहून पूर्ण होईल की नाही, या भीतीने मी कादंबरीलेखनाचे धाडस करू शकले नाही. माझे लेखन सुधारण्यासाठी मला रणजित देसाई, शंकर पाटील तसेच अनेक नामवंत लेखकांचे प्रेमळ सूचनांद्वारे मार्गदर्शन लाभले.’

समारंभाचे प्रास्ताविक प्रा. अशोक दास यांनी केले. वाचनालयाच्या वतीने राजाध्यक्ष यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच वाचनालयाचे स्नेही प्रकाशक अनिल मेहता यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी साहित्यकृती निवडणारे परीक्षक अनुराधा गुरव, श्रीनिवास कुलकर्णी तसेच पुरस्कारप्राप्त लेखकांचीही भाषणे झाली.

**इंदिरा संत पुरस्काराने**
**लक्षणीय ललित गद्य म्हणून गौरवलेले**

**आठवणींचा मोहर**

लेखक : **राजाभाऊ गवांदे**
किंमत : **१६०रु.**




**एकांकिका लेखन स्पर्धेत 'अस्तित्व'ला प्रथम क्रमांक**

'सृजन पुणे' या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या एकांकिका लेखन स्पर्धेत शिवाजी बर्वे यांच्या 'अस्तित्व' या एकांकिकेला प्रथम क्रमांक जाहीर झाला आहे. भास्कर पाटील यांच्या 'दि चेंज', तर गोविंद सांगोडकर यांच्या 'कुरवंडी' या एकांकिकेस अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला आहे. उत्तेजनार्थ पारितोषिके पुढील एकांकिकांना जाहीर झाली आहेत. 'ऑर्किडचं फूल' (लेखक मनोज कोल्हटकर), 'यावच्चंद्रदिवाकरौ' (लेखक : मनीष अनसूरकर), 'सावट' (लेखक : शिरीष देखणे) व 'निर्णय' (लेखिका : डॉ. सुरेखा ठक्कर). या वर्षी स्पर्धेत ६८ लेखकांनी सहभाग घेतला. रोहिणी केतकर, बंडा जोशी व अभय गोडसे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**'पोस्टमार्टेम' कथासंग्रहाला दि. बा. मोकाशी पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या दि. बा. मोकाशी स्मृती पुरस्कारासाठी (१ जानेवारी १९९८ ते १ डिसेंबर २००० या कालावधीतील प्रथम प्रकाशित कथासंग्रहांमध्ये उत्कृष्ट कथासंग्रह) प. बा. सावंत याच्या 'पोस्टमार्टेम'(प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊस) या कथासंग्रहाची निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी डॉ. नीलिमा गुंडी व नंदा सुर्वे यांनी परीक्षक म्हणून काम केले.

**'कोरडी भिक्षा'ला यंदाचा मृण्मयी पुरस्कार**

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या 'कोरडी भिक्षा' या पुस्तकाला 'मृण्मयी' पुरस्कार आणि गो. नी. दांडेकर यांच्या 'महाराष्ट्रदर्शन' या पुस्तकाच्या पुनर्मुद्रित आवृत्तीचे प्रकाशन ८ जुलै रोजी झाले. त्या वेळी प्रा. ग. प्र. प्रधान, डॉ. गं. ना. जोगळेकर आणि डॉ. आनंद यादव यांची भाषणे झाली. डॉ. यादव यांच्या हस्ते श्री. कुलकर्णी यांना हा पुरस्कार देण्यात आला, तर हा प्रधान यांच्या हस्ते 'महाराष्ट्रदर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. यादव म्हणाले, ''अनुभवाला अतिशय प्रामाणिकपणे सामोरे जाणारे लेखक असे श्रीनिवास कुलकर्णी यांचे वर्णन करता येईल. गो. नी. दांडेकर आणि त्यांचे लेखन अनुभवांच्या अस्सलपणाबाबत सारखेच सकस आहे.''

प्रा. प्रधान म्हणाले, ''गोनीदा हे फकिरी वृत्तीचे छांदिष्ट अवलिया लेखक होते. चैतन्याचा स्पर्श त्यांच्या लेखणीला झाला होता. ते खऱ्या अर्थाने धरतीचे पुत्र होते. ते आणि श्रीनिवास



विनायक कुलकर्णी दोघेही सामान्यांतील असामान्यत्व शोधणारे होते. हा त्यांच्यातील समान धागा होता.''

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय देव यांनी केले. डॉ. वीणा देव यांनी पुरस्कारामागील भूमिका विशद केली. मृणाल देव कुलकर्णी-देव यांनी आभार मानले. मधुरा देव-डहाणूकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

**भि. ग. रोहमारे पुरस्कार**

भि. ग. रोहमारे ट्रस्टच्या वतीने भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहेत. १ जानेवारी २००० ते ३१ डिसेंबर २००० या काळात प्रकाशित झालेल्या ग्रामीण साहित्यविषयक पुस्तकांचाच या पुरस्कारासाठी विचार केला जाईल. ग्रामीण लेखक व प्रकाशकांनी आपल्या पुस्तकांच्या प्रती प्रा. गणेश देशमुख, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे ७ या पत्त्यावर पाठवाव्यात.

**कलायात्री पुरस्कार**

नवोदित नाट्यलेखक संतोष पवार, कादंबरीलेखनाबद्दल प्रा. भारत काळे, काव्यलेखनाबद्दल प्रकाश होळकर आणि कथालेखनाबद्दल प्रा. सदानंद देशमुख यांना श्री. शरद पवार यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येकी पंचवीस हजार रुपये, शाल व मानचिन्ह यांचा त्यामध्ये समावेश आहे.

'प्रेमग्रंथ', प्रा. विठ्ठल वाघ यांच्या 'पंढरीच्या वाटेवर' आणि वि. भा. दातार यांच्या 'श्री शिवछत्रपती विजय' या पुस्तकांचे श्री. पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी ग. दि. माडगूळकर यांच्या साहित्यावर आधारित सीडीचेही प्रकाशन करण्यात आले. ही सीडी तयार केल्याबद्दल सुमित्र माडगूळकर यांचा, तसेच विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. आनंद यादव, प्रा. गंगाधर पानतावणे, सिंधूताई सपकाळ, भानू काळे, म. श्री. दीक्षित, रामभाऊ जोशी, पी. डी. पाटील, शिवाजी कवडे आणि मृणालिनी सावंत आदींचा विशेष सत्कार या वेळी करण्यात आला.

**एक लाखाचा युगांतर पुरस्कार**

नाशिकचा एक लाख रुपयांचा युगांतर पुरस्कार या वर्षी नागपूरचे विचारवंत डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांना जाहीर झाला आहे.

**पुणे नगर वाचन मंदिर संस्थेचे पुरस्कारासाठी आवाहन**

पुणे नगर वाचन मंदिर, १८१ बुधवार पेठ, पुणे-२ या संस्थेतर्फे दरवर्षी तीन पुरस्कार (प्रत्येकी १०००रुपयांचे) दिले जातात. यंदा १ जानेवारी २००१ ते २५ डिसेंबर २००१ या कालावधीतील खालील साहित्यप्रकारास पुरस्कार दिले जाणार आहेत.


श्री. ज. जोशी पुरस्कार-ललित, प्रवासवर्णन, व्यक्तीचित्रे, ह. स. गोखले पुरस्कार-संत वाङ्मय, श्री. ना. बनहट्टी पुरस्कार-ललितेतर वैचारिक.

अधिक माहितीसाठी वरील पत्त्यावर संपर्क साधा. फोन - ४४५०५२६

पुस्तक परिचय

## हे पुस्तक आपण का वाचले पाहिजे ?

१. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कथासंग्रहासाठीचा दि. बा. मोकाशी पुरस्कार प्राप्त (२००१)
२. घट्ट विणीचं कथानक आणि एक सहजसुंदर ओघ.
३. प्रत्येक कथेला सामाजिक संदर्भाची पार्श्वभूमी.
४. कथेतील व्यक्तिरेखा मोठ्या ताकदीनं रंगवलेल्या आहेत.
५. लेखकाची स्वतंत्र लेखनशैली.




# पोस्टमार्टेम

**लेखक : प. बा. सामंत**

**अपारंपरिक शैलीतल्या वैचित्र्यपूर्ण वातावरणाने भारलेल्या कथा**

समाजवादी आंदोलनातील एक क्रियाशील कार्यकर्ते प. बा. सामंत हे पुढे शिक्षण व सहकारक्षेत्रात रमले; सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सतत कार्यमग्न राहिले. जीवनाच्या विविध स्तरांवरील त्यांचे आकलन अनुभव वैचित्र्यामुळे आगळेवेगळे ठरले; आणि त्याला कधी कधी कथारूपात शब्दांकित करण्याची उर्मी त्यांना अनावर झाली. प्रख्यात कथालेखिका वसुधा पाटील या त्यांच्या भगिनी. आज सत्तरी पार केलेल्या सामंतांचा पोस्टमार्टेम हा पहिला कथासंग्रह पुस्तकरूपात येत असला तरी या कथा तीसेक वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या आहेत.

पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना १९४३-४४ साली 'तो आणि एक चुकलेले मूल' ही कथा त्यांनी साहित्य सहकारमध्ये वाचून दाखवली होती. १९७० नंतर



सत्यकथा आणि मराठवाडा दिवाळी अंक यात त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या. त्या अनेक वर्षे फाईलीत बंदिस्त राहिल्या होत्या. या पुस्तकाच्या निमित्ताने त्या मराठी रसिकांसमोर येत आहेत.

संग्रहाला ज्या कथेचे नाव लाभले आहे ती पोस्टमार्टेम ही कथा घ्या. तीन आदिवासी स्त्रियांची प्रेते जळगाव जिल्ह्यातील बोरसेगावच्या काळभोर डोहात सापडतात; आणि पोस्टमार्टेम न करताच त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातात अशी बातमी वृत्तपत्रात आल्यावर सरकारी यंत्रणा कशी हलते याचा मसालेवाईक नमुना ही कथा पेश करते. ही बातमी इतरही वृत्तपत्रांत येते; आणि आदिवासी महिला मंडळातर्फे मंत्र्यांकडे एक निवेदन पाठवण्यात येते. त्याच्या प्रती राष्ट्रपती-पंतप्रधानांपासून जिल्हा पोलीस सुपरिंटेंडंटपर्यंत सर्वांना पाठवण्यात येतात. आदिवासी महिलांच्या संशयित मृत्यूची मागणी या निवेदनात केली जाते. गुप्तचर खात्याकडेही चौकशीचे आदेश जातात. चार गुराख्यांनी त्या आदिवासी स्त्रियांवर झडप घालून आपली वासनापूर्वी करून घेऊन, त्यांनी नंतर तक्रार केली तर आफत ओढवेल म्हणून त्यांचे गळे दाबून त्यांची प्रेते गवताच्या भाऱ्याखाली लपवलेली असतात. त्याच वेळी पोलीस पाटील त्यांना अडवतो; ते झाला प्रकार त्याला सांगतात. पोलीस पाटील त्यांना म्हणतो, ''आपल्यापैकी कोणी नाहीत ना? मग ठीक आहे. पोटाशी धोंडा बांधा आणि काळडोहात बुडवा. नंतर चिडीचूप राहा. ..बाबांनो, जात सांभाळली पाहिजे..'' मुद्देमाल संपला की विलायतेची राणीपण काही करू शकत नाही.

डीएसपीच्या कचेरीत या प्रकरणाची चर्चा होते. पाटील फौजदार त्या वेळी गैरहजर राहतो आणि हेडकॉन्स्टेबलचा बळी जातो. मृत्यूची नोंद स्टेशन डायरीमध्ये वेळेवर केली नाही, पोस्टमार्टेमसाठी मॅजिस्ट्रेटला कळवले नाही... म्हणून त्याला निलंबित केले जाते.

पाटील फौजदाराला अहवाल करण्याचा सल्ला दिला जातो. तो त्या तिघी आदिवासी तरुणींच्या नवऱ्यांचे जवाब घेतो. झालं गेलं विसरून जा. घाबरू नका. गावात एकमेकांना धरून राहिलं पाहिजे अशी समजूत घालून प्रेते सापडली तेव्हा कुजल्यामुळे आणण्याच्या परिस्थितीत नसल्याने, त्यांना पंचांसमक्ष काढून जाळण्यात आले असा रिपोर्ट वर पाठवण्यात येतो. विधानसभेत त्यावर प्रश्नोत्तरे होतात. लोकप्रतिनिधींना त्या प्रश्नावर बोलण्याची परवानगी मिळते; रात्री ९ वाजता त्यांचा नंबर लागतो तेव्हा मंत्री महोदय संबंधित अधिकाऱ्याला निलंबित केले आहे आणि चौकशी चालू आहे असे उत्तर देऊन हात झटकतात...

अशा एखाद्या घटनेच्या संबंधात पोलिस यंत्रणा कशी पक्षपातीपणाने काम करते यावर ही कथा प्रकाश टाकते.

वृत्तपत्रातील बातम्या, समाजसेविकेची पत्रे, सरकारी पत्रे, सदनातील कामकाज याद्वारे या घटनेचा पाठपुरावा केला जातो.

'मादी' ही कथा बांगला देश युद्धाच्या पार्श्वभूमीवरील आहे. कर्नल तारीकची रखेल नूर त्याच्या मृत्यूनंतर भयंकर विटंबना सहन करूनही कधीतरी सुटका होईल अशी आशा बाळगून खंदकात राहत असते. तारीकचं बाळ तिच्या पोटात वाढत असतं. पाक सैन्याच्या शरणागतीनंतर एक पाकचा पठाण सैनिक तिला म्हणतो, ''तुझ्या डोळ्यातले सूडाचे जहर पाहवत नाही. उरलेलं आयुष्य तुझ्या बच्चासाठी दे... बच्चा निर्दोष असतो. निष्पाप असतो... स्वार्थाने आम्ही

कधी त्याचा आसुरी नर घडवतो. त्याची लालसा जागवतो... कधी कधी आम्ही त्या बच्चाची मादी घडविते. स्वार्थासाठी तिला दुबळी करतो... माँ होणं तिला तितकसं जमत नाही... अगर बच्चा जियेगा तो तेरे हाथोंसेही सच्चा इन्सान बनेगा. एक बार उसे जिनेका मौका दो. सच्चा हकदार है वो.''

–आणि तो पठाण सैनिक तिला खुदा हाफिज म्हणत खंदकातून बाहेर पडतो. तिचा निरोप घेतो. तेव्हा ती त्याला म्हणते, ''ठहरो मियाँ, मैंभी तेरे साथ बाहर आती हूँ.''

सव्वीस मजली उंच इमारतीचं बांधकाम चालू असताना खडीनं भरलेली घमेली उचलणारी रत्ना मुकादमाच्या नजरेत भरते. अधूनमधून तिला बोलावून तो तिचा उपभोग घेतो. मॉडेल क्वीन फ्लॅटच्या साफसफाईसाठी रत्नाला लिफ्टने नेण्यात येते. त्या आलिशान फ्लॅटमधल्या गुबगुबीत मऊ बिछान्याचा स्पर्श तिला हवाहवासा वाटतो. तिथल्या पुरुषभर उंचीच्या आरशात स्वत:ला ती न्याहाळते. शॉवरखाली मनसोक्त न्हाते. आरशातल्या आपल्या प्रतिमेला म्हणते, ''रत्ना, आता मी या महालाची राणी.'' ती मेकॅनिक दासप्पाच्या नजरेला नजर देते. तिला हवा तो अपेक्षित प्रतिसाद मिळताच सुखावते. पण तेवढ्यात डिंगडॉग बेल वाजते आणि मुकादम सहा-सात तरुणींना घेऊन येतो. रत्नाला एकदम गळून गेल्यासारखे वाटते. दासप्पाने 'रत्ना, तू आता जा' असे म्हटल्यावर तर तिला आपली कंबर विलक्षण दुखतेय असे जाणवते. ही 'राणीमहाला'ची स्वप्ने पाहणाऱ्या रत्नाची अपेक्षाभंगाची करुण कहाणी.

तीन हातभट्ट्यांचा मालक मुकुंददादा गिरणीचा पंधरा दिवस चाललेला संप मोडण्याची सुपारी घेतो. त्यासाठी गिरणीमालकांकडून त्याला बराच मलिदा मिळालेला असतो. पार्टीच्या कचेरीबाहेर उभा राहून मुकुंददादा संपकरी नेत्याला आई-बहिणीवरून शिव्या देतो. नेत्याचे नाव घेऊन मुर्दाबादच्या घोषणा देतो... नेता घाबरतो. पण एक हडकुळा कार्यकर्ता नेत्याच्या नावाने जिंदाबादच्या घोषणा देतो आणि मुकुंददादा मुर्दाबाद अशा घोषणांना लोक साद देतात. दादा हॉटेलात पाहतो तर तो हाडकुळा त्याच्या डोक्यात वहाण हाणत म्हणतो, ''भडव्या, आमच्या पार्टीला, आमच्या नेत्याला शिव्या घालतोस?'' तर पोलीस इन्स्पेक्टर त्या कार्यकर्त्याचा हात धरून म्हणतो, ''तू थांब आता. मी पुढचं बघतो. दारू पिऊन दंगामस्ती करतो काय? हवालदार, दादाला चौकीवर घेऊन चल.'' आणि दादाची सुटका होते. कार्यकर्ता हॉटेलमध्येच थांबतो. हॉटेलमालक म्हणतो, '' नेतालोक नाय करेल ते तू केला. वारे बहाद्दर. पब्लिक तुला दुवा देल.'' कार्यकर्ता बाहेर बघतो. पब्लिक अजिबात नसतं. फक्त चार गुंड दिसतात. ''ही मुकुंददादाची माणसं तर नसतील ना?'' एकदम त्याचं अवसान गळून पडतं. आपण एकाकी आहोत या भीतीनं त्याला घाम फुटतो...

कधीमधी धैर्य दाखवणाऱ्या कार्यकर्त्याच्या हिमतीची ही अवस्था!

दिलीप राजवाडे याने वृत्तपत्रांना गुप्त शासकीय बातमी दिली म्हणून त्याला अटक करण्याचा आदेश घेऊन त्याच्या घरी इन्स्पेक्टर मोहिते येतात. दोन दिवसांआधीचा दिलीपबरोबरचा संवाद निर्मलाला आठवतो. राजधानीत बोलण्यासाठी ट्रंक कॉल लावला असताना फोन भलतीकडेच लागून दिलीपला एक विलक्षण संवाद ऐकू येतो. त्याची बातमी छापून आली तर देशभर खळबळ माजणार हे त्याला जाणवते. त्या बातमीचा खरेखोटेपणा जाणून घेण्यासाठी



त्याला बाहेर पडणे क्रमप्राप्त असते. जाण्यापूर्वी तो तिची इच्छा नसतानाही आपला काँज्युगल राइट बजावतो; आणि वर म्हणतो, ''हा रेप नव्हता.'' इन्स्पेक्टर मोहिते तिला दिलीपचा ठावठिकाणा मिळवण्यासाठी सतावू लागतात तेव्हा ती त्यांना बजावते, ''दिलीप कुठं आहे ते मला माहीत नाहीय. पण समजा, ते समजलं तरी तुम्हाला मी सांगणार नाही. तुम्हाला काय करायचं असेल ते करा.'' तेव्हा इन्स्पेक्टर मोहित्यांना तिच्या हसण्याने शंभर गुलाब तिच्या व्यक्तित्वावर फुलल्याचा भास होतो. (रेप).

आपला सहकारी डॉ. मुकेश हा विवाहित आहे, चारूचा पती आहे म्हणून त्याच्यावर प्रेम असूनही, त्याच्याशी शारीरिक जवळीक साधायचे टाळणारी अमिता हिला आपल्या मनातील संघर्ष संपुष्टात आणता येत नाही.

एके दिवशी ती स्वत:ला झोकून देण्याचे ठरवते, मनात वर्षानुवर्षे राखून ठेवलेले बांध तोडून मुक्त व्हायचे, स्त्रीत्वाचा पूर्णांक गाठायचे ठरवते. पण तो जवळ आल्यावर मात्र म्हणते, ''प्लीज मुकेश, बी अ गुड बॉय. माझ्या वाटेला जाऊ नकोस. मी रागावेन हं. खरंच रागावेन.'' तो तिला विचारतो, ''अमिता, तू डॉक्टर झालीस पण तुझं स्त्रीत्व तू कुठं हरवून बसलीस? माझ्याशी हा पाठशिवणीचा खेळ का खेळत आहेस?''

आणि अर्धवट झोपेत अमिता ओरडते, ''डॉक्टर, एक चिमटा हरवला आहे आणि गर्भाशयही हरवले आहे. कुणाचे? माझेच वाटते.''

''भाई मेलगाडी कब आयेगी?'' ही कथाही पत्नीला नकळत पूर्वाश्रमीची प्रेयसी अरुणा हिला भेटायला गेलेल्या एका डॉक्टरची आहे. ही भेटही २५ वर्षांच्या कालावधीनंतर व्हायची आहे. अरुणाने कळवलेले आहे की, ती बाँबे मेलने मुंबईला जाणार आहे. रात्री साडेतीनला तुमच्या गावच्या स्टेशनवर वीस मिनिटे थांबणार आहे, तेव्हा आपण पहिल्या वर्गाच्या डब्यात भेटू.'' डॉक्टर त्याप्रमाणे स्टेशनवर जातो. त्याला कळते की, मेल तासभर लेट आहे.. तो नंतर आलेल्या मेलचे डबे धुंडाळतो. अरुणा भेटत नाही. हमाल सांगतो, ही तर दिल्ली मेल होती. मग बाँबे मेलचे काय झाले? ती वेळेवर सुटली असे हमाल सांगतो तेंव्हा एवढे धडपडत आलो होतो, हे तिला आता कधीच कळणार नाही अशी चुटपुट त्याला लागून राहते.

सातपुड्याच्या आदिवासी भिल्लांमध्ये काम करणाऱ्या कुमार-सुमिता या डॉक्टर दांपत्याला दोन मुले. सुखी संसार. पण कुमारला आपल्या तब्येतीत काहीतरी बिघाड झाल्यासारखे वाटते. तो आपले गुरू डॉ. बांदेकर यांच्याकडे मुंबईला चेकअपसाठी जातो. हॉचकिन्स डिसीझ-कॅन्सरचे निदान होते. चार-पाच महिनेच काय ते आता आपले आयुष्य उरले हे त्याला कळून चुकते... तो लिफ्टमधून खाली येतो तेव्हा सगळा भूतकाळ त्याच्या डोळ्यांपुढून जातो. पुढे काय? मृत्यू कसा असेल? सुमिताचे काय? मुलांचे काय?... लिफ्टमधून बाहेर पडताना तो घामाने थबथबलेला असतो. त्या 'रिपोर्ट'ने त्याच्या अवघ्या आयुष्याचेच गणित उलटेपालटे करून टाकलेले असते.

उन्हाळ्यात उष्ण वारे वाहतात. ते अंगाची लाही-लाही करतात. या लूमध्ये जनजीवन कसे चालते याची वेगवेगळी दृश्ये 'लू' या चार पृष्ठांच्या कथेत येतात. भर दुपारी स्टेशनवर थांबलेल्या पॅसेंजरमधल्या प्रवाशांचे हाशहुश... राष्ट्रीय प्रयोगशाळेत दुष्काळातही तग धरणाऱ्या

गव्हाच्या जातीचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांची, वीजकपातीमुळे एअरकंडिशनर्स बंद असल्याने चाललेली तगमग.. नदीच्या कोरड्या पात्रात खड्डा खणून गढूळ पाण्याची ओंजळ पिणारा रिक्षावाला...

डेक्कन क्वीनचा ड्रायव्हर शापूर याचा स्वत:च्या कौशल्यावर विश्वास. रुळावर उभी राहणारी त्याची मुलगी गौरी-तिच्याजवळ नेऊन ट्रेन नेमकी उभी राहणार हा त्याचा हातखंडा प्रयोग... पण एके दिवशी– त्याचे हे कौशल्य तिचा बळी घेते; अशा चमत्कृतिपूर्ण कथानकांचीही सामंताना हौस दिसते.

'कॉट नं. ८७' या कथेत हॉस्पिटलमधले वातावरण आहे हे नावावरूनच स्पष्ट होते. कॉट नं. ८७ वरच्या वृद्ध निराधार पेशंटच्या शस्त्रक्रियेसाठी नर्स लिली स्वत:च्या शिलकीचे पैसे काढून डॉक्टरांना देते. ऑपरेशन होते पण तो वृद्ध दगावतो... तेव्हा कर्तव्यभावनेने लिली ती बॉडी डेड रूममध्ये हलवते. आणि नव्या पेशंटची तेथे सोय करते. गळ्यात दाटून आलेला हुंदका मोठ्या प्रयासाने आवरते. जीवनाचा हा खेळ चालूच राहतो.

अशा वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरच्या, वेगवेगळ्या भावनिक गुंतागुंतीच्या घटनांमध्ये सामंतांना रस वाटतो. त्या घटना त्यांना लिहिण्यास उद्युक्त करतात. त्या व्यक्तिरेखांची सुख-दु:खे ते वाचकांपुढे ठेवतात. त्यांच्या समस्यांचा मागोवा घेतात. प्रत्येक व्यक्तीचे जीवन वेगळे. समस्या वेगळ्या. उत्तरे वेगळी. त्यामुळे या कथांचा घाटही अपारंपरिक. चाकोरीबाहेरचा. संवेदनाप्रधान.

**पृष्ठे : १७८ किंमत : १२५रु. सवलतीत : १०६रु.**
**सभासदांना : ९४रु. पोस्टेज : २०रु.**

## मनाची पकड घेणाऱ्या कथांचे संग्रह

| | | |
|---|---|---|
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५०रु. |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस | अनु. अंजनी नरवणे | १२०रु. |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५०रु. |
| खिडकीला डोळे असतात | डॉ. बाळ फोंडके | ११०रु. |
| कथा सावलीची | माधवी देसाई | ७० रु. |
| सागर | माधवी देसाई | ६० रु. |
| सावित्रीचा निर्णय | नागनाथ कोत्तापल्ले | १००रु. |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १३०रु. |
| निसटलेले | आशा बगे | १००रु. |
| ऋतूवेगळे | आशा बगे | ६० रु. |
| कातरवेळ | एम् . डी. लहानकर | ७० रु. |
| शेष- अवशेष | अरविंद रे | १२५रु. |


**सभासदांना २५% सवलत! अन्यथा १५% सवलत. पोस्टखर्चासह रक्कम पाठवा.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.



## हे पुस्तक आपण का वाचले पाहिजे ?

१. दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांना 'ओशोंनी' दिलेली समर्पक उत्तरे.
२. बदलत्या काळानुसार आयुष्याच्या अर्थाचा शोध घेण्याचा प्रयत्न व ओशोंचे सर्वस्पर्शी विचार.
३. प्रश्न व त्याची उत्तरे असे सहज-सोपे रूप.
४. जिज्ञासूंनी वाचावे असा उत्तम मार्गदर्शक ग्रंथ.




## नवी पहाट

**अनु : प्रज्ञा ओक**

**ज्या क्षणी तुम्हांला स्वत:चा शोध लागतो, त्याक्षणी जीवनाचे ध्येयही उमगते.**

ओशो रजनीश यांच्या 'द न्यू डॉन' या पुस्तकाचे 'नवी पहाट' हे मराठी रूप. प्रज्ञा ओक यांनी भाषांतराच्या दृष्टीने मूळ इंग्रजी पुस्तक वाचायला घेतले तेव्हा त्यांना जाणवले, ''ओशोंच्या स्वत:च्या इंग्लिशचं वळण काही वेगळंच आहे. सोपे शब्द. पण त्यांचा गर्भित अर्थ सूक्ष्म आणि सखोल. त्यांच्या गुरु-शिष्य संवादातून जाणवणारी विचारांची उत्तुंग झेप स्तिमित करणारी. ओशोंचे साधे बोलणे म्हणजे अप्रतिम काव्याचा नजराणा. अशा इंग्रजीचं मराठीकरण करताना भाषा सहज सोपी व भावपूर्ण हवी. ती क्लिष्ट वा जडबंबाल नको. रोज सकाळी ओशो आश्रमात एक तास प्रवचन देत. कधी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत. या प्रवचनांची पुस्तके निघत. एकेक दिवस एकेक सत्र.

या पुस्तकात अकरा सत्रांचा समावेश आहे.

ओशोंना भक्तांनी जिज्ञासू वृत्तीने विचारलेले प्रश्न; आणि ओशोंनी त्यांना दिलेली उत्तरे. हे प्रश्न कशा स्वरूपाचे आहेत?

१. तुमच्या दृष्टीक्षेपाने एखादा सोनेरी प्रकाशानं भरलेला प्याला आपण प्राशन करतोय– असा अनुभव येतो. याला पवित्र संवाद म्हणता येईल का?

२. बंड व सुधारणा यात फरक काय? बंडखोर माणूस सुधारणावादी असतो का?

३. विकास व परिवर्तन– या प्रक्रियेत कष्ट आहेत तसा आनंदही आहे. कष्टांशिवाय काही मिळत नाही हे खरं का?

४. तुमच्याशी मी खोलवर जोडला गेलो आहे. बागेत काम करतानाही तुमच्याशी एकरूप होतोय असे जाणवते. पण कधी कधी उतावीळपणा, ईर्षा, राग, गांभीर्य या सर्व विकारांचा गदारोळ होतो. तुमच्यापासून आपण दूर चाललोय असे वाटते. हृदयात तुमचं अस्तित्व कायम असावं असं वाटतंय. ते शक्य आहे का?

५. एक भक्त म्हणून माझं व्यक्तित्व हे तुमच्यासारखं होताना दिसतंय. हे बरोबर चाललंय ना?

६. आपल्याला कधीच खरं ज्ञान होणार नाही– या विचारानं मला उद्‌ध्वस्त झाल्यासारखं वाटतं. यावर काही मार्ग आहे का?

७. माझं आयुष्य मला कुठं घेऊन जाणार आहे? आनंदी, आत्मविश्वासपूर्ण, स्वस्थचित्त राहणं मला जमेल का?

८. माझं दु:ख व्यक्त करण्यासाठी मला अज्ञात अशा धैर्याची गरज आहे. माझा आनंद व्यक्त करण्यासाठीही त्यापेक्षा जास्त धैर्याची गरज आहे. हे बरोबर आहे ना?

९. सत्याचं मोजमाप करता येतं का? कसं?

१०. आत्मसन्मान आणि अभिमान, अहंकार आणि गर्व यात फरक काय?

११. आपल्या दयेचा व लोभाचा लाभ व्हावा असं मजजवळ काय आहे?

१२. मला काहीतरी करावंसं वाटतंय. पण मी दिशाहीन आहे. या मानसिक अस्वस्थ अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी काम करायला हवं?

१३. इथलं वातावरण वेगळं वाटतं. पण आपण अजून पूर्णपणे जागृत झालेलो नाही याची रुखरुख वाटते. मी काय करू?

१४ . मूळ स्वभाव, उपजत प्रवृत्ती व सवय यात काय फरक आहे?

१५. प्रश्न माहीत करून घ्यायची मला गरज आहे का? कारण मला कसलेच प्रश्न पडत नाहीत.

१६, नम्र व विनयशील याचा खरा अर्थ काय?

१७. हरे राम, मी या एकातून कसा बाहेर पडणार?

१८. माझ्यात असुरक्षिततेची भावना फार प्रबळ आहे? मी काय करू?

१९. सगळं आयुष्यच उद्‌ध्वस्त, भग्न करणारा अनुभव मला भेडसावतो आहे. अश्रूंचा महापूर येणे खरोखर शक्य आहे का?

२०. मला आत्मप्रकटीकरण करायचे आहे. पण शब्द सापडत नाहीत. त्यासाठी शब्दांची



खरोखर गरज आहे का?

२१. तुमच्याजवळ असताना वाटतं की बाहेरचं जग म्हणजे वेड्यांचा बाजार. इथं मात्र वाटतं की आपण शहाणे होत आहोत. बाहेरच्या जगात गेल्यावर आपण पुन्हा वेडे होऊ अशी भीती वाटतेय. ती योग्य आहे का?

२२. मला आंबे खायला खूप आवडतात. पण तुमचा आचारी एकापेक्षा जास्त आंबा देणे मना आहे असे म्हणतो. त्यामुळे ॲडम-इव्हसारखा मी संभ्रमात पडलो आहे. आपण मला काही मार्ग सुचवा.

२३. तुमचे शब्द कानावर पडतात खरे, पण आपण ते ऐकतोय असे वाटतच नाही. श्रवण कसे करावे हे सांगू शकाल का?

२४. मला आतून एक प्रकारचे रिकामपण-रितेपण जाणवतेय. मी काय करू?

२५. आपल्या जगण्याला काही उद्देश हवा असं सूफी म्हणतात. मी तुमच्या समवेत आहे, तेव्हा कोणते काम यामुळे काही फरक पडेल का?

२६. नवमानव हा बौद्धिकदृष्ट्या अलौकिक असेल. अध्यात्माबाबत त्याची काय पातळी राहील?

२७. मला काहीतरी विशेष बनायचं आहे. पण या धडपडीतून काय जमणार आहे याबद्दल मी साशंक आहे. मी स्वत:पासून दूर दूर पळतो आहे असेही मला वाटते. यातून मी बाहेर कसा पडू शकेन?

**२८. माझ्यात प्रचंड ऊर्जा आहे. ती कशी वापरावी हेच कळत नाही.**

२९. तुम्ही कोण आहात?

३०. आज अनेक घटना घडत आहेत की त्या घटना मी पूर्वी कधीतरी अनुभवलेल्या आहेत असे वाटत राहते. ध्यानधारणेशी याचा काही संबंध आहे का? 'देजावू हे खरे आहे का?

३१. प्रेम आणि शत्रुत्व या दोन्ही गोष्टी परस्परसंबद्ध आहेत का? काही वेळा प्रेमिक हे शत्रूसारखे वागतात का?

ओशो या प्रश्नांची उत्तरे देताना वेगवेगळे युक्तिवाद पेश करतात. समर्पक दाखले वा दृष्टान्त देतात. त्या त्या संकल्पनांचा उलगडा करून दाखवतात. अनेक सूत्रमय सिद्धांत सांगतात. आश्चर्यकारक विधाने करतात. मानसशास्त्रीय गुंते सोडवतात. विरोधाभासात्मक विचारांनी अचंबित करतात.

प्रेम हा मौल्यवान अनुभव असतो. ते दोन आत्म्यांचं मीलन असते. परंतु प्रेम करण्याआधी आपण आपलं हृदय, आपलं मन ओळखलं पाहिजे. अगदी आत खोलवर जाऊन स्वत:च्या अस्तित्वाचा छडा लावला पाहिजे. प्रेम करणं म्हणजे स्वत:बरोबर राहणं. स्वत:ची भीती वाटणाऱ्याला प्रेम करताच येत नाही. दुसऱ्यावर प्रेम करण्याआधी स्वत:ला तपासून बघा. ध्यानधारणा करणारा माणूसच खरा प्रेमिक होऊ शकतो. (१८८-९)

**नवीन माणूस हा जुने पुराणे धर्म आणि जुनी पुराणी शास्त्रे या दोन्हीपासूनच मुक्त असेल. आयुष्य हे धर्माच्या मर्यादेत बसण्यासारखं नाही तसंच ते विज्ञानाच्याही मर्यादेत सामावणारे नाही. या दोन्हीपेक्षाही जीवन फार फार विशाल आहे; आणि भविष्यातही ते विशालच राहणार आहे. ...अज्ञान असं जे असतं ते तुमच्या अस्तित्वात असतं, तुमच्या जाणिवांमध्ये असतं.** (१४६-४७)

ज्या क्षणी तुम्हांला स्वत:चा शोध लागतो. त्याच क्षणी तुम्हाला आपल्या जगण्याचा उद्देशही सापडतो. आयुष्यातलं प्रयोजन काय याला महत्त्व नाही. तुम्हांला स्वत:चा शोध लागणं हे महत्त्वाचं आहे. त्यासाठी चिंतन, ध्यानधारणा हाच एकमेव मार्ग आहे. (१४०)

धर्मशास्त्रांनी या सुरक्षित भावना, निश्चितता आणि मानसिक आधार यांची निर्मिती केली. आता विज्ञानही तेच करतंय. विज्ञानाला सर्व काही ज्ञात आहे, तुम्हाला काळजी करायचं कारण नाही, अशा भाबड्या कल्पना मांडून विज्ञानही तुमची दिशाभूल करीत आहे. विज्ञान या शब्दाचा अर्थच मुळी सगळ्यांची माहिती, सर्वज्ञान असा आहे. धर्मशास्त्र, विज्ञान किंवा तत्त्वज्ञान यांपैकी कोणतंही शास्त्र या सृष्टीचं कोडं कधीच उलगडू शकणार नाही. कारण ही शास्त्रं माणसाच्या प्रयत्नानं काम करतात. (१४७)

**प्रत्येक नातेसंबंध म्हणजे स्वत:च्या उन्नतीची एक संधी असते; तेव्हा त्याचा तिरस्कार न करता त्याच्या सगळ्या अवस्थांतून आनंद मिळण्याचा प्रयत्न करणे श्रेयस्कर! (८९)**

तुलना न करता मिळवलेला सन्मान म्हणजे आत्मसन्मान.(४९)

**स्वाभिमान वा आत्मसन्मान म्हणजे अहंकार नव्हे. स्वत:बद्दल अभिमानाची भावना बाळगणं म्हणजे दुसऱ्या कोणाला कमी लेखणं नव्हे. (४९).**

मी अहंकाराच्या विरुद्ध आहे, पण स्वाभिमानाच्या किंवा आत्मसन्मानाच्या विरुद्ध नाही. (४९)

प्रेम, सत्य, सुख, धन्यता, ईश्वर या गोष्टींना मोजमाप नाही. परिमाण नाही. कसोटी नाही. या गोष्टी फक्त अनुभवाच्या आहेत. आतल्या आहेत. व्यक्तिगत आहेत. (४२).

ओशोंची उत्तरे ही जीवनविषयक अनेक नीतिसूत्रे व मार्गदर्शक सुभाषिते या रूपात प्रकट होतात. दृष्टान्ताद्वारे त्यावर अधिक प्रकाश टाकला जातो.

ही उत्तरे तशी अगदी सरळ साधी कधीच नसतात. त्यात अनेक गुंतागुंतीचे मुद्दे अंतर्भूत असतात आणि निर्णय घेणे अवघड असते.

नम्र व विनयशील याचा अर्थ काय यासारखा प्रश्न वरवर साधा व शाळकरी वाटतो; पण ओशोंचे त्यावरचे भाष्य अनेक नव्या शक्यतांचा पट उभा करते. कुठल्याही शब्दकोशात विनयशील या शब्दाची धार्मिक, आध्यात्मिक संदर्भातील व्याख्या मिळणार नाही असे ते म्हणतात. **गर्विष्ठ नसणं म्हणजे नम्र; पण मी गर्विष्ठ नाही असं म्हणणं हाही गर्वाचाच एक भाग असतो. नम्रतेचा अर्थ अहंकाररहित असा होतो. पण अहंकार नाही असा कोणी माणूस सापडणे मुश्किल.** सभ्यपणाचा अर्थच असा आहे की तुम्हाला अहंकार आहे पण तुम्ही तो दाखवत नाही... हा वरचा तलम आवरणाचा बुरखा दूर केला की लगेच रानटी अहंकार बाहेर येतो. इत्यादी इत्यादी. या सर्व विवेचनाने आपण अधिक गोंधळात पडतो– असेही वाटू शकेल. पण हा भाषेपलीकडील अनुभूतीचा भाग आहे असे एकदा मानले की सगळे धुके दूर होईलही!


– एकूणच ओशोंच्या या भुलभुलैयात एकदा आपण अडकलो की नवनवे धक्के सहन करण्याची क्षमता आपल्यात येत राहते.

**पृष्ठे : १९२ किंमत : १००रु. सवलतीत : ८५रु.**
**सभासदांना : ७५रु. पोस्टेज : २०रु.**



## हे पुस्तक आपण का वाचले पहिजे ?

**१. माता होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणीने वाचावे असे मार्गदर्शक.**
**२. गर्भधारणा ते बालसंगोपन या काळातील स्त्रीच्या शरीरातील स्थित्यंतराचे आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण.**
**३. खेड्यातील तसेच आधुनिक शहरी स्त्रीपर्यंत प्रत्येकीसाठी उपयुक्त माहिती.**
**४. शारीरिक बदलांबरोबरच मानसिक बदलांबाबतही विवेचन.**




# सुखद मातृत्व

**रत्नावली दातार**

**जीवनाचे सार्थक करणारा एक विलक्षण अनुभव म्हणून मातृत्वाकडे पहा**

'मदरहूड वुइथ ए स्टाइल' या पुस्तकाच्या आधाराने गरोदरपण आणि बाळंतपण याविषयी महत्त्वाचे मार्गदर्शन करणारे 'सुखद मातृत्व' हे पुस्तक प्रत्येक मातेला आणि विशेषत्वाने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील मिडवाइफ परिचारिकांना व दायांनाही उपयुक्त ठरेल.

जन्माला येणारे प्रत्येक मूल हा एक चमत्कारच असतो, हे तर खरेच आहे; परंतु त्याच बरोबर तो एक परमेश्वराजवळ जाण्याचा ईश्वरी संकेत असतो. प्रत्येक मूल हे ईश्वराचेच रूप असते आणि गरोदरपणात त्या गर्भाची व्यवस्थित काळजी घेणे ही परमेश्वराचीच पूजा आहे, अशा श्रद्धेने डॉ. रत्नावली दातार अपत्यसंभवाकडे पाहतात.

परमेश्वराने आपल्याला मानवाचा जन्म दिला आणि मानव हा या सृष्टीतील सर्वात प्रगत, बुद्धिमान आणि प्रयोगशील अशी निर्मिती आहे. या मानवी जन्माचे सार्थक होण्यासाठी ज्या

अनेक गोष्टी कर्तव्यभावनेने पार पाडाव्या लागतात त्यापैकीच वंशसातत्य ही देखील एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे  हे आपापल्या गुणसूत्रांमध्येच अंतर्निहित असते आणि त्यासाठी योग्य त्या प्रेरणा वा उर्मी विशिष्ट वयात प्रभावी व्हाव्या अशी निसर्गाची योजना असते. आपल्याच रक्तामासांतून, आपल्याच कुशीतून एक नवीन जीव जन्माला घालण्याचा आनंद हा अवर्णनीयच होय.

स्त्री-पुरुषाच्या मीलनाने गर्भसंभव होतो; परंतु त्या गर्भाचा भार स्त्रीलाच स्वशरीरात वाहिला लागतो; त्याला गर्भाशयातच परिपुष्ट करून एका सक्षम स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आकार दिला जातो. ही सर्व प्रक्रिया म्हटले तर स्वाभाविक सरळ सहजसाध्य आहे, म्हटले तर जगातली अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.

९ महिन्यांच्या काळात गर्भाशयात गर्भाची वाढ निरोगी, निकोप होणे, प्रसूती सुलभपणे होणे, आणि अनंत भावनिक, शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमता असणाऱ्या एका व्यक्तित्वाचे या जगात पदार्पण होणे ही सर्व प्रक्रिया घराघरात अनुभवाला येणारी सर्वसामान्य घटना आहे; परंतु ती कधीकधी अत्यंत जीवघेणी आणि गुंतागुंतीचीही होऊ शकते; आणि मातेला तसेच बाळालाही घातक ठरू शकते. बीजाचे रोप, क्षेत्र निकृष्ट असेल तर किंवा त्यात रुजणारे बी कमजोर असेल तर येणारे रोप खुरटलेले असेल. स्त्री-पुरुष निकोप असतील, तर त्यांच्या मीलनातून निर्माण होणारा अंकुरही सुदृढच निपजेल; स्त्री-पुरुष अशक्त, रोगी, कमजोर असतील तर जन्मणारे बालकही अनेक समस्या निर्माण करीत पालकांची तसेच स्वत:चीही फरफट करीत राहील. माता-पित्याकडून मिळणाऱ्या गुणसूत्रांनी जन्माला येणाऱ्या नव्या जीवाचे स्वरूप ठरते. स्त्री-पुरुषांच्या प्रत्येकी २२ जोड्या या सारख्याच असतात. पुरुषाकडून मिळणाऱ्या २३ व्या क्रोमोझोममधील एक्स किंवा वाय या क्रोमोझोमनुसार गर्भाचे लिंग ठरते. वाय क्रोमोझोममुळे गर्भाला पुरुषत्व लाभते. **एक्समुळे स्त्रीत्व. नेहमी मुलीच होतात म्हणून स्त्रीला दोष देणे हा प्रकार पूर्वी समाजात सर्रास रूढ होता. नव्या संशोधनाने स्त्रीच्या ऐवजी पुरुषच यासाठी जबाबदार ठरतो.**

डॉ. रत्नावली दातार यांनी या पुस्तकात प्रथम आई होण्यासाठी प्रत्येक विवाहित स्त्रीची मनोभूमिका पक्की होण्यापासून आरंभ केला आहे. शरीरातील विशिष्ट इंद्रियांची रचना मातृत्व, गर्भसंभव, गर्भसंगोपन वगैरे दृष्टींनी कशी कार्यरत असते याचीही कल्पना दिली आहे. गर्भारपण कसे ओळखावे, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या चाचण्या, गरोदरपणी घ्यावयाची काळजी, गरोदरपणात आढळणारी सर्वसामान्य दुखणी, (ओटीपोटात दुखणे, पांढरा स्राव वाहणे, त्वचा ताणली जाणे, रक्तदाब अचानक वाढणे, स्तनांची वाढ होणे, पोटात दुखणे, मळमळणे, उलट्या होणे, छातीत जळजळणे, रक्तातील लोह कमतरता जाणवणे, अपचन, वांब येणे, लघवी अडकणे, गर्भाशयात जास्त पाणी होणे, स्तनांमध्ये दुखणे इ. इ.) यांची कल्पना दिली आहे.

स्तनपानाच्या दृष्टीनेही पहिलटकरणीच्या मनात अनेक शंका असतात. स्तनपान हे सर्वात स्वस्त आहे; ते पूर्णतया निर्जंतुक असते. आईचे दूध बालकाला पचायला सोपे असते. त्यात ॲलर्जीचा धोका नसतो. वरच्या दुधाप्रमाणे जीवाणू-विषाणू बाधा होण्याची शक्यता नसते, बाळाची प्रतिकारशक्ती वाढते, स्तनपानामुळे आई व मूल यांच्यामध्ये जवळिकीचे प्रेम-~~विश्वासाचे नाते दृढ होते. स्तनपानामुळे स्तनांचा देखणेपणा कमी होतो, सौंदर्यात तो उणेपणा~~



आणतो या आक्षेपात तथ्य नाही असे डॉ. दातार आवर्जून सांगतात. अर्थात दूध पाजणाऱ्या मातेने स्तनांची योग्य प्रकारे काळजी घ्यायलाच हवी असेही त्या बजावतात. स्तनाग्रे स्वच्छ व कोरडी ठेवणे, बाळाला पाजायला घेताना कोमट पाण्यात मऊ रुई वा कापड भिजवून स्तनाग्रे पुसून घेणे, दूध खूप गळत असल्यास ब्रेसियर दिवसातून तीन-चार वेळा बदलणे, स्तन दाटू न देणे, स्तनाग्रे दिवसात थोडा वेळ तरी मोकळी हवेवर उघडी राहू देणे, दोन स्तनपानांमध्ये क्रीम वा तेल लावणे, स्तनपान करणाऱ्या स्त्रीने योग्य आहार घेणे, (मद्यपान-धूम्रपान टाळणे, विशिष्ट औषधे टाळणे), इ. टिप्स लक्षात ठेवायला हव्या.

गरोदरपणाच्या काळात अनेक प्रकारे सावधगिरी बाळगावी लागते. तीन-तीन महिन्यांचे तीन टप्पे पाडून त्या त्या टप्प्यात काय करावे, काय करू नये, काय खावे-प्यावे, व्यायाम कुठला करावा, याबाबत बहुमोल सूचना दिल्या आहेत.

बाळाच्या जन्माच्या आधीचा व नंतरचा काळ हाही अनेक दृष्टींनी कसोटीचा असतो. बाळंतपणासाठी तयारी करताना कितीतरी गोष्टींची जमवाजमव करावी लागते. बाळंतपण ही एक कठीण स्थिती आहे. जी स्त्री प्रसूती कळा सहन करते ती जगातली कोणतीही वेदना सहन करू शकते, असेही म्हटले तर चालेल.

बाळंतपणानंतर येणारा लठ्ठपणा टाळण्यासाठी आहार आणि व्यायाम, यांचा योग्य तो वापर करावा लागतो. त्याबाबत स्वतंत्र प्रकरणाद्वारे मार्गदर्शन केले आहे. अनेक आकृत्यांद्वारे व्यायामाचे प्रकार स्पष्ट केले आहेत. ब्रेड, बिस्किट, केक्स, मटण, चिकन, फॅटी फिश, तळलेले पदार्थ, तेलतूप, कोकाकोला, बियर, वाईन वगैरे पदार्थ या काळात खाऊ नयेत. शाकाहारी लोकांनी चौरस आहार घ्यावा. दूध घ्यावे. मांसाहारी लोकांनी रोज एक अंडे आणि नॉन फॅटी तूप याची त्याला जोड द्यावी.

**गर्भतेजाने स्त्रीचे अंगचे सौंदर्य झळाळून येते. कांती उजळ होते. चेहऱ्यावर हास्य येते. केसांनाही तकाकी येते. समतोल आहार, मानसिक प्रसन्नता, उत्तम वातावरण यामुळे हे तेज अधिक झळाळते. आईपण मौजमजेत जगा, जीवनाचे सार्थक करणारा एक अनुभव म्हणून त्याकडे पाहा. जाणकार मातृत्वाचा आनंद घ्या, असा संदेश देणारे हे पुस्तक आहे.**


**पृष्ठे : ८० किंमत : ५०रु. सवलतीत : ४३रु.**
**सभासदांना : ३८रु. पोस्टेज : २०रु.**


## मुलांचा विकास घडवण्यास मार्गदर्शक ठरणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| तुम्ही आणि तुमची मुलं | अनु. अविनाश भोमे | ६०रु. |
| मुलांवरचे संस्कार | श. व्यं. काश्यपे | ८०रु. |
| अभ्यासातील प्राविण्य | अनु. वसंत नागपुरे | ३५रु. |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस् . इटोकर | ६०रु. |

**सभासदांना २५% सवलत! अन्यथा १५% सवलत. पोस्टखर्चासह रक्कम पाठवा.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.




# रानातील प्रकाश

**विजय पाडळकर**

## प्रत्यक्षातल्या व्यक्तींपेक्षाही अधिक निकटवर्ती वाटणाऱ्या कथाकादंबऱ्यांतल्या नायक-नायिका.

नांदेडचे विजय पाडळकर हे एक रसिक आस्वादक वाचक आहेत; ते खूप पुस्तके वाचतात, चित्रपट बघतात आणि त्याबद्दल विचार करतात. का आवडले आपल्याला पुस्तक? का आवडला चित्रपट? काय खास होते त्यात? असे प्रश्न स्वत:लाच विचारतात. कथा-कादंबऱ्यांतील पात्रे त्यांना अवतीभवती वावरणाऱ्या माणसांएवढीच जिवंत किंबहुना त्यापेक्षाही अधिक जवळची वाटतात. त्या माणसांच्या सुखदु:खांबद्दल त्यांना आस्था वाटते. त्या पात्रांच्या शोकांतिकांनी त्यांना वाईट वाटते. हे भागधेय त्यांच्याच नशिबी का यावे म्हणून ते त्या त्या कथाकादंबरीतील घटनांचा अन्वयार्थ लावू पाहतात. आणि या शोधयात्रेत त्यांना खरोखरच काहीतरी संगती लागल्याचा साक्षात्कार होतो. तो साक्षात्कार, त्या शोधातला आनंद ते इतर वाचकांशीही वाटू पाहतात. त्यासाठी छोटेमोठे लेख लिहितात. अशा लेखांची पुस्तकेही प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहतात.

''आवडलेल्या पुस्तकांनी दिलेला आनंद आपल्यापुरता जवळ न ठेवता इतरांपर्यंत पोहोचवणे आणि थोर लेखकांचे आपल्यावरील ऋण अंशत: तरी फेडण्याचा प्रयत्न करणे'' ही प्रेरणा त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ''त्या त्या कलाकृतीचा अर्थ शोधताना जीवनाचा अर्थ लावण्याचा लेखकाने जो प्रयत्न केला आहे तो तपासून पाहण्याचा आणि आपल्या जीवनदृष्टीशी त्याचे साम्य व विरोध शोधण्याचाही माझा हेतू आहे.'' असे म्हणण्याइतपत स्वत:च्या जीवनदृष्टीची पृथक् जाणीव पाडळकरांना आहे. जी. ए. कुलकर्णी यांनी त्यांना स्केचेस ऐवजी ऑईल्स, रेखाचित्रांऐवजी तैलचित्रे काढण्याचा सल्ला दिला; त्यामुळे पाडळकर छोटेखानी वृत्तपत्रीय लेखांऐवजी प्रदीर्घ आस्वादक लेखांवर लक्ष केंद्रित करू लागले. देखिला अक्षरांचा मेळावा, कथांच्या पायवाटा व चंद्रावेगळं चांदणं हे त्यांचे लेखसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

'रानातील प्रकाश' या ७८ पृष्ठांच्या पुस्तकात एकूण सहा लेख आहेत. त्यापैकी डॉ. झिवागो या नोबेल पुरस्कारप्राप्त रशियन कादंबरीवरचा लेख हा तब्बल २५ पृष्ठांचा आहे आणि त्यात 'जीवन हे सातत्याने पुढे वाहत असतेच आणि आपले अस्तित्व अर्थपूर्ण करणाऱ्या गोष्टी कुणा ना कुणाला कुठे ना कुठे भेटत असतातच.' (पृ. २५) असा डॉ. झिवागो आणि लारा यांच्या या प्रेमकहाणीचा ध्वन्यर्थ प्रकट केला आहे. पाडळकरांच्या मते ''झिवागो व लारा या दोघांच्या जीवनाची कथा सांगण्यासाठी ''पास्तरनाकने लेखणी उचललीच नव्हती.'' झिवागो व लारा हे एका विशाल जीवनपटावरील केवळ दोन बिंदू आहेत. जसजशी कादंबरी पुढे सरकत जाते तशी त्यांची जागा बदलत जाते, ते पार्श्वभूमीला जात राहतात आणि शेवटी शेवटी ज्याचे भविष्य खरेच महत्त्वाचे असते असा बिंदू स्वत: वाचक हाच असतो. वाचक आणि त्याचा जीवनानुभव, त्याचा दृष्टिकोन हीच गोष्ट आता चिकित्सा, औत्सुक्य, कुतूहल व निरीक्षणाची गोष्ट ठरते. लेखकाचा प्रकाशझोत काळाचा पडदा सारून आता वाचकावर पडलेला असतो. कारण माणूस संपून जातो पण मानवी जीवनाची बहुरूपी विविधता कधी संपत नाही. जीवन हे सातत्याने पुढे वाहत असते.''

डॉ. झिवागो वाचून झाल्यावर ''आपण काही काळ मूकपणे बसून राहतो (कारण त्याशिवाय गत्यंतरच नसते) तेव्हा आपल्या हातात असलेले हे पुस्तकही जीवनावरचा आपला विश्वास दृढ करीत आले– तोच जुना विश्वास, जो काही काळ डळमळीत झाला होता.'' अशा शब्दांत पाडळकर या पुस्तकाच्या वाचनाची फलश्रुती मांडतात.

डॉ. झिवागोच्या आयुष्यातून लारा निघून जाते आणि त्याच्या जीवनातील प्रतिभा, सौंदर्य व काव्यही निघून जाते. पत्नी पॅरिसमध्ये परागंदा, प्रेयसी लारा हिच्याशी ताटातूट अशा मनाच्या विकल अवस्थेत डॉ. युरी झिवागो मॉस्कोला परत येतो आणि चिवट जीवनासक्तीच्या बळावर जगत राहतो. परंतु या जगण्यात त्याला फारसे स्वारस्य उरलेले नसते. कादंबरीकार पास्तरनाकलाही त्या निष्प्रेम आयुष्याच्या मरुभूमीच्या चित्रणात रस उरत नाही. ''आता झिवागोच्या आयुष्याच्या शेवटच्या आठ किंवा दहा वर्षांची कहाणी थोडक्यात सांगणे बाकी उरले आहे. ह्या काळात तो हळूहळू स्वत:पासून आणि जगापासूनही अलग पडत गेला.'' अशा शब्दांत स्वत: पास्तरनाकच ह्या अंतिम पर्वावर ओझरती नजर टाकून मोकळा होतो.

या अंतिम दशकात डॉ. झिवागो आपली देखभाल करणाऱ्या मारिनाशी लग्न करतो, त्याला दोन मुले होतात. सारे काही निसर्गक्रमाने चालू असते. यावर भाष्य करताना पाडळकर म्हणतात,

''एखाद्या सुंदर इमारतीच्या भग्न अवशेषांत कुणा भिकाऱ्याने आपला संसार थाटावा तसे हे जीवन भासते. सौंदर्य, प्रेम, विश्वरहस्य यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या ह्या माणसावर उद्याच्या भाकरीचा शोध घेण्याची पाळी येते. ह्या उत्कट, कविहृदयाच्या माणसाचे असे फिकट होत जाणे ही बाल मनाला फार हुरहूर लावून जाते. पास्तरानाकने वापरलेले दिवसाच्या प्रकाशातील चंद्राचे प्रतीक या ठिकाणी फार समर्पक वाटते.''

त्याचप्रमाणे डॉ. झिवागोच्या एका कवितेतील ''शेवटपर्यंत जगत राहणे म्हणजे केवळ पोरखेळ नव्हे ''हे वचनही अर्थपूर्ण ठरते. 'अस्तित्व' हे केवळ असण्यामुळे अर्थपूर्ण आहे. पाडळकरांच्या मते पास्तरनाक एकाच वेळी दोन परस्परविरुद्ध भूमिका पुढे ठेवतो. **एकीकडे अस्तित्वातील सौंदर्याची स्तुती करणे व दुसरीकडे निखळ अस्तित्वाचा जयजयकार करणे. यापैकी कोणती भूमिका श्रेष्ठ हा निर्णय पास्तरनाक वाचकावरच जणू सोपवतो.**

युद्ध, क्रांती यासारख्या समग्र जीवनाला व्यापून टाकणाऱ्या वादळांच्या संदर्भात मानवी जीवन हे वाऱ्यावर भिरभिरणाऱ्या पानासारखे क्षणी असते हे या कादंबरीचे एक सूत्र. तसेच एखाद्या वटवृक्षाला फांद्याफांद्यांतून पारंब्या फुटाव्यात व त्या खाली जमिनीत घुसून त्यातून वृक्षविस्तार व्हावा अशा आशयाच्या पारंब्या या कादंबरीला फुटलेल्या आहेत असेही पाडळकर म्हणतात. मानवी जीवनातील प्रेमाचे स्थान, कलेच्या मर्यादा, जीवन मृत्यूच्या पार्श्वभूमीवर चाललेला यशापयशाचा व हर्षखेदाचा खेळ, चिरंतनाच्या दर्शनाने नात्यानात्यांवर आयुष्यावर बसणारा विश्वास वगैरे बाबीही या कादंबरीतून अधोरेखित होतात असे ते मानतात.

'अनोळखी सहप्रवासी' या लेखात टॉलस्टॉयची पत्नी सोन्या हिच्यावर ॲने एडवर्डसने लिहिलेल्या पुस्तकाच्या आधारे पाडळकरांनी सोन्याच्या चरितकहाणीतील महत्त्वपूर्ण बाबींची नोंद केली आहे. १८४४ मध्ये डॉ बेहर्स यांच्या संपन्न कुटुंबात जन्म. सोळा वर्षांनी वडील असणाऱ्या लिओ टॉलस्टॉयशी परिचय व लग्न, टॉलस्टॉयच्या पूर्वायुष्यातील स्त्रिया व अनौरस पुत्र यांचा तिला लागलेला शोध, १८६३ मध्ये पहिल्या अपत्याचा जन्म, वॉर अँड पीसच्या प्रकाशनाने टॉलस्टॉयला लाभलेली कीर्ती, टॉलस्टॉयला नैतिकतेचे अधूनमधून येणारे झटके, टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन त्यांच्या निकट आलेला तीस वर्षीय तरुण व्हादिमीर चेर्टकाव्ह व त्याच्यावरून सोन्या-टॉलस्टॉय यांच्यात झालेला वाद, सोन्या व टॉलस्टॉय यांच्यात वाढत गेलेला दुरावा, २७ ऑगस्ट १९१० रोजी ८२ वर्षांच्या टॉलस्टॉयने घर सोडून जाण्याचा घेतलेला निर्णय व त्यानंतर अल्पावधीतच रेल्वे स्टेशनवर त्याला आलेला मृत्यू या सर्व घटनांची रूपरेखा ॲने एडवर्डसच्या पुस्तकावरून पाडळकर देतात आणि ''एकमेकांवर उत्कट प्रेम करणारी माणसेही एकमेकांपासून का दुरावतात? एकमेकांना समजून घेण्यात कमी का पडतात? प्रदीर्घ सहजीवनानंतरही अनोळखी सहप्रवासीच का राहतात?'' अशा प्रश्नांचा ते मारा करतात.

सुखी सहजीवनासाठी काही प्रमाणात माणसाने 'मी'पणाचा त्याग करायला हवा, समंजसपणा दाखवायला हवा; नाहीतर जीवनाची संध्याकाळ अशी काळोखी होते– असा निष्कर्षवजा संदेश पाडळकर देऊ पाहतात. प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची प्रखर जाणीव आणि घटनांची मालिका यात मीपणाचा त्याग इतक्या सहजपणे होतोच असे नाही. 'नियती' हा घटक येथे आणावा की नाही असा प्रश्नही पडतो. पण इतक्या सहजपणे त्याचे उत्तर देणे हा कदाचित आत्मवंचनेचा प्रकार ठरेल.

या शिवाय मॅकटीग (फ्रँक नॉरिस), लाइट इन दि फॉरेस्ट (रानातील प्रकाश– कॉनरॉड रिक्टर), ए सिम्पल ऑनरेबल मॅन (कॉनरॉड रिक्टर), या तीन कादंबऱ्यांचा परिचयही पाडळकरांनी दिला आहे.

कॅथरीन मॅन्सफील्ड या लेखिकेचा परिचयच 'जप आणि प्रार्थना' या लेखाद्वारे करून देण्याचा प्रयत्न केला आहे. १८८८ मध्ये न्यूझीलंडमध्ये जन्मलेल्या कॅथरीनच्या नावावर सहा कथासंग्रह, काही लघु कादंबऱ्या व एक काव्यसंग्रह असून ९ जानेवारी १९२३ रोजी तिचा मृत्यू झाला. उण्यापुऱ्या ३५ वर्षांच्या आयुष्यात, असाध्य व्याधीशी टक्कर देत तिने लेखनाचा झपाटा लावून, कथारूपी अमर क्षणशिल्पे उभारली. संज्ञाप्रवाही लेखनपद्धतीचा कथेतला



पहिला यशस्वी वापर करण्याचे श्रेय तिच्याकडे जाते. मानवतावादी दृष्टिकोन, मार्मिक व्यक्तिरेखन व प्रभावी वातावरणनिर्मिती ही तिच्या काव्यात्म उत्कट कथांची वैशिष्ट्ये. तिचे जर्नलही तिच्या निर्मितिप्रक्रियेवर प्रांजल प्रकाश टाकते. ''तिच्यापर्यंत पोचणारा सत्याचा प्रकाश तिच्यातून, तिच्या कथांतून परावर्तित होत राहिला आणि त्या प्रकाशाने वाचकांची मनेही उजळून निघाली.'' असे पाडळकर म्हणतात. क्षणाक्षणाचा वेध घेत ती व्यापक जीवनाचे रहस्य प्रकट करते. तिचे जग मर्यादित असले तरी ते उत्कटतेमुळे विशाल वाटते.


साहित्यातले घटनाप्रसंग व व्यक्तिव्यक्तींचे सुखदु:ख हे वास्तवापेक्षाही अधिक अर्थपूर्ण व अस्सल मानून त्याचा अन्वयार्थ लावण्याचा हा आस्वादक प्रयत्न पाडळकरांच्या रसिकतेला दाद द्यायला लावतो.

**पृष्ठे : ८० किंमत : ६०रु. सवलतीत : ५१रु.**
**सभासदांना : ४५रु. पोस्टेज : २०रु.**

## नवी स्पर्धा -पुस्तकांची नावे ओळखा व बक्षीस मिळवा.

खाली काही पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे अर्धभाग दिले आहेत. त्यावरून आपण पुस्तकाचे नाव ओळखायचे आहे.


१




२




३


४



५


६

बरोबर उत्तर देणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीची प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.


**मुदत १५ सप्टेंबर २००१ पर्यंत**

**स्पर्धेत भाग घेण्यासाठी 'मेहता मराठी ग्रंथजगत'चे सभासद असणे आवश्यक.**

**आमचा पत्ता : मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# हे पुस्तक आपण का वाचले पाहिजे ?

१. शब्दाधीन कथा शब्दातीत व्हावी ही ओढ.
२. कथा म्हणजे जीवनातील अस्वस्थतेचं प्रतिबिंब.
३. खास आगळ्या लेखनशैलीनं एका वेगळ्याच उंचीवर पोहोचलेल्या कथा.
४. रोज घडणाऱ्या घटनांतून नवा विचार मांडणाऱ्या कथा.
५. विलक्षण व्यक्तिचित्रे- डॉ. सोनार,डॉ.देवल, सिंधूताई सपकाळ.




## माझं माझ्यापाशी

**व. पु. काळे**

**जिथं आहे तिथं न रमतं ते मन. अशा शापित मनाचा मी सम्राट.**

व. पु. काळे यांच्या 'माझं माझ्यापाशी' या पुस्तकाच्या ऑक्टोबर १९९८ पासून तीन आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकातील लेखांचे स्वरूप संमिश्र आहे. लेखांची लांबीही तीन-चार पृष्ठांपासून वीस-पंचवीस पृष्ठांएवढी आहे.

पार्टनर या कादंबरीची जन्मकथा व नंतर तिच्यावर आलेल्या प्रतिक्रिया यांचा एका लेखात मागोवा घेतला आहे.

'माझं माझ्यापाशी' या आत्मपर चिंतनात १९८९ साली डेट्रॉइटच्या मराठी साहित्य संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून आलेले आमंत्रण व त्यानंतरची परदेशातील भ्रमंती यांच्या अनुषंगाने अनेक गोष्टींची नोंद झालेली आहे. पत्नी आजारी असल्याने जावे की नाही असा संभ्रम होता; परंतु डॉ. नीता जोशी यांनी स्वखर्चाने बरोबर येण्याची तयारी दाखवून मिळतील तेवढे कार्यक्रम घेण्याचा सल्ला दिला. त्यामुळे पंधरासोळा कार्यक्रम आणि पन्नास दिवसांचा अमेरिका दौरा असा घाट जमून आला. परतल्यावर पत्नीला भेटल्यावर पूर्वीसारखाच शून्यभाव



तिच्या डोळ्यात कायम होता; तो पाहून आपल्या मर्मस्थानावर काठीचा फटका बसलाय असे त्यांना वाटले. जाणिवा हरवलेले शरीर. संवेदनाशून्य. तीन वर्षांच्या प्रार्थनेच्या अभिषेकानेही त्यात फरक पडला नव्हता. पडला नाही. मेरा मुझमें कुछ नाही हे कबीराचे वचन त्यांना आठवते. ''बत्तीस वर्षांच्या करारानं फिक्स्ड डिपॉझिटसारखी एक पावती त्यानं मला सांभाळायला सांगितली होती; ती त्यानं नेली. मी अमेरिका मागितली नव्हती. ती त्यानं दिली. वाणी त्याची, प्रतिभा त्याची, लेखणी त्याची. कथन त्याचं आणि ते ऐकण्यासाठी लाखो कान जे पुरवले तेही त्याचेच.'' असे ते सर्व श्रेय ईश्वराला देऊन समाधान मानतात. 'शब्दाधीन कथा शब्दातीत व्हावी'मध्ये आपल्या कथालेखनाचा एक धावता आढावा ते पेश करतात. 'हे राहून गेलं' या लेखात संगीत वगैरे छंद तसेच मागे पडले म्हणून हळहळतात. बाविसाव्या वर्षापर्यंत आपण लेखक होऊ हे त्यांच्या स्वप्नातही आलेले नव्हते. स्वातंत्र्योत्तर भारताची अवस्था त्यांचा विषण्ण करते. अमीर नागरिकांचा हा गरीब देश असे त्यांना वाटते.

'माझं माझ्यापाशी' या वपुंच्या लेखसंग्रहात काही व्यक्तिचित्रे आली आहेत. डॉ. सोनार, डॉ. देवल, सिंधूताई सपकाळ, टायपिस्ट निलाखे इ.

सोनं लुटवणारा सोनार हे बिर्ला हॉस्पिटलमधील डॉ. दीनानाथ सोनार यांचे भावरम्य व्यक्तिचित्रण आहे. ''आईवडिलांच्या मारहाणीचा रतीब चुकवण्यासाठी मी शाळेत जायला लागलो.'' असे सांगणारे खानदेशातले तळोद्याचे एक पोर धुळे, सातारा, पुणे वगैरे ठिकाणी शिक्षणासाठी भ्रमंती करते. मॅट्रिकला ७३ टक्के मार्क. फर्ग्युसनमध्ये डॉ. कर्वे त्याला प्रवेश देतात. डॉक्टर झाल्यावर कोल्हापूरला दवाखाना काढतात. चित्रपट दिग्दर्शक बाळ गजबर त्यांना एका महाराजांकडे नेतात.

'मी महाराज वगैरे मानत नाही. ही ऐतखाऊ माणसं, लोकांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन लोकांना उल्लू बनवतात.' असं म्हणणारे डॉ. दीनानाथ सोनार गजबरांचं मीठ खाल्लंय म्हणून त्यांच्या आग्रहावरून महाराजांच्या मठीत जातात. ''तुमचा हा मुलगा बोटीने चार ऑगस्टला चालला परदेशात'' असे महाराज गजबरांना सांगतात तेव्हा डॉ. सोनार अविश्वास दाखवतात. पण यशवंतराव चव्हाण यांच्या कृपेने ते खरोखरच बोटीने लंडनला जातात. तारीखही चार ऑगस्टच बरोबर ठरते. एफ. आर. सी. एस. होतात. परत भारतात येतात. पुन्हा महाराज सांगतात, ''तू बॉम्बे हॉस्पिटलमध्ये नोकरीला लागणार आहेस.'' घनश्यामदास बिर्लांची भेट होते. बिर्ला विचारतात, ''पगाराची अपेक्षा काय?'' डॉ. सोनार म्हणतात, ''मी पगार मागितलेलाच नाही. अगोदर बॉम्बे हॉस्पिटलमध्ये माझ्यालायक काम आहे की नाही ते बघू दे. मी तुमच्या उपयोगाचा आहे की नाही ते तुम्ही बघा. पगाराची काय घाई? मला अगोदर काम करू दे. माझं काम बघा. तुम्हीच माझी किंमत ठरवा...''

घनश्यामदास बिर्ला सेक्रेटरीला सांगतात. ''हा माणूस आपला. काही झालं तरी याला गमवायचं नाही.'' बिर्लांनी पुढं त्यांना नागदा इथं स्वतंत्र हॉस्पिटल उभारून दिलं. नागद्याचे लोक त्यांना देव मानतात. बिर्लाशेटजी गळ्यातला ताईत मानत. वपुंचे ते खास दोस्त बनले. देव न मानणाऱ्या या देवमाणसाबद्दल वपु भरभरून लिहितात. हे या सोनारांचं सोनं बावनकशी आहे. थोडंफार अहंकाराचं तांबं होतं ते हरीकाका महाराजांनी दूर केलं. चोरीला न जाणारी, आयकरात सूट न मागणारी श्रीमंती त्यांनी मिळवली. ते हसले की अंगावर मखमल मोरपीस फिरवते असे वपुंना वाटते.

अशाच आणखी एका एम. डीं.चा परिचय वपु घडवतात. हे एम. डी. कुलकर्णी– वय वर्षे पंचाहत्तर. एक साधे शिक्षक. मुख्याध्यापक. पंचाहत्तरीत हार्ट ॲटॅक. शस्त्रक्रियेची गरज. विद्यार्थी एक लाख रुपये जमा करून देतात. अनेक मुलांना त्यांनी घडवलेले. सांभाळलेले. धारावीसारख्या वस्तीजवळच्या हायस्कूलला त्यांनी नावारूपाला आणलेले. त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञानच आगळेवेगळे!

चिखलदऱ्यातल्या आदिवासींमध्ये सामाजिक काम करणाऱ्या, सिंधू सपकाळ यांच्याबद्दलची हकीकत ऐकून वपु भारावतात. नवऱ्याने संशय घेतला, सख्ख्या आईने लाथाडले. देवळापुढे भजनं म्हणून ती पोट भरते. आपल्या बुलढाण्याजवळच्या देवस्थानी ती जाते. ''मला दिशा दाखव. मी हरलेली नाही, हरणार नाही.'' म्हणून देवाला आळवते. तिला दृष्टान्त होतो. भटकत भटकत ती चिखलदऱ्याला येते. तो भाग अभयारण्य म्हणून जाहीर केला गेल्याने पाच हजार गायी चारापाण्याला महाग होतात. ती आदिवासींना घेऊन सचिवालयात जाते. ''सायेब, हुकुमशाही संपली. लोकशाही आली. मी असंख्य लोकांची प्रतिनिधी म्हणून आलेय. मला जरा तुम्ही-आम्ही म्हणा की...'' वनमंत्र्यांना ती ठणकावते. वनमंत्री पोलिसाच्या बंदुकीकडे इशारा करतात. तेव्हा ती म्हणते, ''सायेब, मला नावगाव न्हाई. पेपरवाल्याला मी म्हाइत नाही. पण सायेब, मंत्र्याच्या खोलीत बाईचा खून असं पेपरला आलं तर तुमची खुर्ची राहील का? त्यापेक्षा, मी सांगते ते देऊन टाका ना!... चिखलदऱ्यातल्या माझ्या पाच हजार गायींना चारा द्या. त्यांना प्यायला पाणी द्या. मधल्या कोअर एरियात गाई पाणी पिऊ शकतात. संपूर्ण जंगलात पाणी न्हाई. आम्हाला उभं राहू द्या. श्वास घेण्यापुरतं तरी राहू द्या. फॉरेस्ट ऑफिसर म्हणतात, माझे ८४ वाघ आहेत. पण माझ्या पाच हजार गाई आहेत... सायेब, त्यांना जर चारापाणी न्हाई भेटलं तर तुमचं समदं ऑफिस मी पेटवून देईन व स्वत:लाही त्यात जाळून घेईन.''

अशा सिंधू सपकाळना न्याय मिळतो. चार बुकं न शिकलेल्या या बाईच्या एकपात्री लढ्याची कहाणी ऐकून व. पु. भारावून न गेले तरच नवल!

असाच भूलतज्ज्ञ डॉ. देवल यांच्यावरचा लेखही त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारा आहे. एमबीबीएस नंतर ते इंदूर सोडून मुंबईला येतात. भूलतज्ज्ञ होतात. स्त्री मुक्ती चळवळ, ग्रंथाली वगैरेत रस घेतात. कीहीमच्या उजाड डोंगराला हिरवंगार करतात. वृक्षसंगोपन, निसर्गसेवा यात रमतात. अशी कुठल्याही कामात झोकून देणारी माणसं वपुंना आवडतात.

चमकदार शब्दयोजनेची नाट्यपूर्ण वाक्ये श्रोत्यांना ऐकवून टाळ्यांचा कडकडाट ऐकण्याची हौस दांडगी. वपुंनी या लेखांमध्येही अशी सुभाषितवजा वाक्ये शक्य तेथे विखुरलेली आहेत. ती वाचताना वाचकही चक्रावून जातो.

दोनच अवस्था खऱ्या. अहंकार नाहीतर समर्पण.

अहंकार म्हणजे संसार. समर्पण म्हणजे मुक्ती.

अहंकार म्हणजे मी. समर्पण म्हणजे परमात्मा.

आयुष्य म्हणजे समर्पण. (११)

जाणीव म्हणजे जग

प्रार्थनेत मागणी आली की प्रार्थना संपली. ती भिक्षेची याचना झाली. (१३)



श्रद्धा म्हटलं तर संवादच संपतो. तर्क हा बुद्धीचा प्रांत मानला तर श्रद्धा ह्या एका धारणेपुढं बुद्धी गप्पच राहते. तो कप्पा बंदच ठेवायचा. (८१)

शासनानं सामान्य माणसाला, स्वत:चं अंदाधुंदीचं, भ्रष्टाचारी राज्य चालवण्यासाठी औदार्यानं एकच गोष्ट बहाल केली आहे. तिचं नाव महागाई. लाखो रुपयांची माया गोळा करून देणाऱ्या दुभत्या गाई शासनाजवळ आणि बाकी सगळ्यांना महागाई. या महागाई पोटी नोकरी करणाऱ्या सगळ्या स्त्रिया जन्माला आल्या. (८१)

प्रपंच आणि नोकरी, दोन्ही पातळ्यांवर झगडा देणारी प्रत्येक 'स्त्री' सावित्रीच आहे. ती वर्षभर वटसावित्रीची भूमिका बजावत आहे. (८२)

जिथं आहे तिथं न रमतं ते मन. अशा शापित मनाचा मी काळे घराण्यातला सम्राट. (८५)

कशातच मन रमत नाही. उभारी गेली की फार भारी पडतं. (८५)

आई या शब्दाची फोड मी अशी करतो. आभाळातला आ. ईश्वरातली ई. त्या दोन स्वरांच्या आधारावर आई उभी राहते. (८७)

ईगो याचा अर्थ शरीरधर्मासारख्या गोष्टी– टॉयलेटमधून जाऊन करायच्या असतात इत्यादी गोष्टींची जाणीव, एवढ्यापुरताच वापरला गेला आहे. सुपर ईगो म्हणजे समाजाने आणि परंपरेने लाभलेले विचार. हे मानसशास्त्रीय अर्थ आहेत. मानसशास्त्राप्रमाणे ईद, ईगो आणि सुपर ईगो अशा तीन अवस्था असतात. ईदचा कालखंड वय वर्ष ती ते सहा. या वेळी मुलाच्या मनावर होणारे परिणाम आयुष्यभर त्याचा पाठपुरावा करतात. माणसाच्या स्वभावाचा बराचसा पॅटर्न त्या काळात पक्का होतो. (९२)

आपण जसे आहोत तसे असायला नको होतं हे वाटणं ह्यालाच माणूस म्हणतात. (९४)

पतिपत्नींमध्ये संवाद न होणं ही खरी शोकांतिका... प्रत्यक्ष मृत्यूपेक्षा जित्याजागत्या माणसांचा संवाद संपणं हेच त्याचं खरं मरण आहे. (९६)

स्वातंत्र्याचा अर्थ शोधताना मला मन, बुद्धी आणि शरीर हे तीन प्रांत दिसले. मनात निर्माण होणाऱ्या इच्छा पूर्ण करता येतील एवढी शारीरिक क्षमता हवी. इथूनच स्वातंत्र्य शब्दाला अनेक वाटा फुटल्या. (९९)

वैयक्तिक वेदना, अन्याय यांना सामाजिक आशय देता आला पाहिजे आणि सामाजिक किंवा दुसऱ्या कुणाच्याही दु:खाची तीव्रता वैयक्तिक जाणिवेच्या पातळीवर जगता आली पाहिजे... ही माझी ललित लेखन (लघुकथा फॉर्म प्रमाणात) करण्यामागची भूमिका आहे. (१०४)

मार्क्सनं माणुसकीचा विचार केला. पण इन्डिव्हिज्युअल म्हणून माणसाचा विचार केला नाही. (११९)

भूतकाळातल्या अनुभवांचा, त्यावरून केलेल्या विचारांचा आणि घटनांचा अमाप मोठा साठा म्हणजे बुद्धी. आणखीन एका मिनिटानं काय होणार आहे याचं ज्ञान बुद्धीजवळ नसतं. (१४९)

**पृष्ठे :१७६ किंमत : १००रु. सवलतीत : ८५रु.**
**सभासदांना : ७५रु. पोस्टेज : २०रु.**

# फुले आणि काटे

**ग्रंथसमृद्धी आणि ग्रंथालयसमृद्धी बरोबरच**
**अमेरिकेत दिसणारी समृद्ध ग्रंथप्रवृत्ती**

अमेरिका हा सर्वार्थानं समृद्ध देश. ग्रंथप्रेमींना आकर्षण वाटेल अशी तिथली ग्रंथसमृद्धी आणि ग्रंथालयसमृद्धी. गेल्या वर्षी वॉशिंग्टन स्टेटमधील सिॲटल येथे राहण्याचा योग आला. प्रोजेक्टवर काम करणारी माझी मुलगी. दिवसभर तिच्या कामात व्यस्त. घर शहराच्या प्रमुख भागात तरी वर्दळ नाहीच. आजूबाजूला भरदिवसा पूर्ण शांतता. नि:शब्द. हा मूकचित्रपट दिवसभर पाहणारे मी व माझा नातू.

अशा या वातावरणात एक वरदान होतं. सिॲटल पब्लिक लायब्ररी. आमच्या घरापासून तीन ब्लॉक्स दूर. आम्ही राहात होतो त्या भागाची रचना वैशिष्ट्यपूर्ण. वॉटरफ्रंट म्हणजे बंदर. हा पहिला रस्ता. मग पर्वतीच्या पायऱ्या चढून जावं तसं चढणावर पुढला एकेक रस्ता. आमचा रस्ता ८ वा. म्हणजे इमारतीचा आठवा मजलाच म्हणा ना! चौथ्या रस्त्यावर लायब्ररी.

नातवाला घेऊन मी आमच्या घरापासून तीन ब्लॉक्स अंतरावर असलेल्या लायब्ररीत जायची. तिथे ट्रेमध्ये ठेवलेली विविध पत्रकं, परिपत्रकं आणि माहितीपत्रकं चाळायची. हे सर्व विनामूल्यच असायचं. त्यातलं एक महत्त्वाचं माहितीपत्रक होत. 'रीड ऑन' ग्रंथालयातल्या विविध उपक्रमांची माहिती त्यात असायची. ज्येष्ठ नागरिकांना संगणकाचं मोफत शिक्षण, संगीताचे जलसे, मुलांसाठी कार्टून फिल्मस्, नाटकांचे उत्सव, आर्थिक व्यवहार कसे करावे यासाठी मार्गदर्शन वर्ग व इंग्रजी संभाषण व इंग्रजी भाषा शिकविण्यासाठीचे वर्ग. आता अमेरिकेत कशाला इंग्रजीचे वर्ग असा आपल्या मनात विचार येईल. पण तेथे चिनी, व्हिएतनामी, मेक्सिकन वगैरे लोक राहतात, त्यांना इंग्रजी येत नाही, म्हणून हे वर्ग. मे २००० चं रीड ऑन मी वाचायला घेतलं आणि एका नवीनच उपक्रमाची माहिती मला मिळाली. त्याचं नाव ''लूझिंग जिऑग्राफी'' म्हणजे मूळ देश आणि वंश वेगळा; पण आता अमेरिकेत स्थायिक झालेल्या आणि लेखिका म्हणून नावाजलेल्या स्त्रियांना भेटण्याची संधी. आपल्याकडे 'लेखक तुमच्या भेटीला' हा कार्यक्रम असतो तसा. पण मूळ उद्देश या लेखिकांच्या पुस्तकांचा संदर्भ घेऊन ''दुरावलेल्या जन्मभूमी'' बद्दल बोलणं, पूर्वायुष्य दुरावलेल्या जन्मभूमीबद्दल वेगळ्या देशात आणि उत्तरायुष्य अमेरिकेत हे कसं वाटतं? याचं प्रतिबिंब तुमच्या लेखनात पडतं का? येथे आल्यावर मूळ देशाशी नातं कसं असतं, विशेषत: मानसिक नातं? या देशात कायमच वास्तव्य करायचं हे खरंच मानसिक पातळीवर स्वीकारता येतं का? मग लेखिकांच्या पुस्तकातील यासंबंधीचे उतारे वाचणं आणि श्रोत्यांशी प्रश्नोत्तरं.

या कार्यक्रमात तीन वेगवेगळ्या दिवशी तीन लेखिका होत्या. पहिल्या कॅथलीन अल्काला. यांच्या तीन पुस्तकांना अमेरिकेत पुरस्कार मिळाले होते. दुसऱ्या लीडीया मिनायोटा. याही



लेखिकेच्या अनेक साहित्यकृती पुरस्कारप्राप्त होत्या. तिसऱ्या लेखिका होत्या भारती कर्चनर. भारती हे टिपिकल भारतीय नाव वाचून मी चमकले. पण आडनाव कर्चनर. अर्थबोध होईना. या नक्की मूळ भारतीय असतील का? त्यांचा फोटो नीट पाहिला. बोलके डोळे आणि भारतीय चेहरा. मग 'रीड ऑन'मध्ये त्यांचा परिचय वाचला. १९९८ मध्ये पहिली कादंबरी 'शिवा डान्सिंग', तर १९९९ मध्ये 'शर्मिलाज बुक' प्रसिद्ध आणि अमेरिकन माध्यमांनी या पुस्तकांची घेतलेली दखल. चार पुस्तकं भारतीय पाककृतींवर आणि ५० च्या वर लघुकथा प्रसिद्ध. हा परिचय वाचून खात्री पटली की, भारतीबाई नक्की भारतीयच असल्या पाहिजेत. मग १ जूनला लायब्ररीत गेले. संध्याकाळी ७ वाजता नॅन्सी पर्ल या वॉशिंग्टन सेंटर फॉर बुक्सच्या कार्यकारी संचालय बाई भारतीबाईची मुलाखत घेणार होत्या. साडेसहा वाजता मी लायब्ररीतील ली ऑडिटोरियम या हॉलमध्ये गेले. तेव्हा हॉल रिकामा होता. बरोबर पावणेसात वाजता भारतीबाई त्यांचे जर्मन-अमेरिकन पती कर्चनर,'रीड ऑन'च्या संपादिका चिनी-अमेरिकन ख्रिस हिगाशी, मुलाखतकार नॅन्सी पर्ल हॉलमध्ये आले. त्यानंतर पाच ते दहा मिनिटांत २०-२२ श्रोते. आम्ही दोन भारतीय– मी आणि एक दाक्षिणात्य संगणकतज्ज्ञ.

कार्यक्रम उत्कृष्ट होता. मुलाखतकार नॅन्सी पर्ल उत्तम तयारी करून आल्या होत्या. भारतीबाईंच्या उत्तरांनी तर मी भारावूनच गेले. संभाषणातून कळलं, त्या मूळच्या बंगाली. व्यवसायानं संगणकतज्ज्ञ. त्यांच्या पुस्तकाबद्दल, भारतीय पाकक्रियांबद्दल, भारताबद्दल श्रोते प्रश्न विचारत होते आणि त्या माहितीपूर्ण, मनोरंजक आणि चपखल उत्तरे देत होत्या.

कार्यक्रम संपला. माझ्या साडीवरून मी भारतीय असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. मग आम्ही थोडा वेळ गप्पा मारल्या. त्यांच्या 'शिवा डान्सिंग' या कादंबरीबद्दल माझ्या मनात विलक्षण उत्सुकता निर्माण झाली. पण पुस्तक काही मला ग्रंथालयातून घरी मिळणार नव्हतं, कारण मी तिथे पाहुणी. ग्रंथालयात जाऊन वाचायचं तर नातू लहान. मुक्काम संपत आलेला. ख्रिसना मी हे सांगितलं. त्या म्हणाल्या, 'एक मिनिट थांबा' अक्षरश: एक मिनिट दुसऱ्या मिनिटाला पुस्तकाची कोरी करकरीत प्रत त्यांनी माझ्या हातात ठेवली. 'वाचल्यावर ग्रंथालयात कुणाकडेही आणून द्या. वर 'बुक ग्रुप' हे लेबल असल्याने पुस्तक माझ्याकडे बरोबर पोहोचेल.' असं म्हणाल्या. कादंबरी इतकी छान होती की, दोन दिवसांत ती वाचून झाली. मी आभारप्रदर्शक चिठ्ठी, भारतीबाईंना पत्र आणि पुस्तक ग्रंथालयात नेऊन दिलं. आणखी २ दिवसांनी मी निघणार होते. मनात आलं, पुस्तक ख्रिसबाईंकडे पोहोचलं असेल का? भारतीबाईंकडे त्यांनी पत्र धाडलं असेल का? म्हणून ख्रिसबाईंना फोन केला. तो त्यांच्या फोनवर रेकॉर्ड झाला. पाच मिनिटांत त्यांचा मला फोन आला. 'तुमची चिठ्ठी व पुस्तक मिळालं. तुमचं पत्र भारतीबाईंना पाठवलं आहे. थँक्स.' नेमकं संभाषण. मधुर आवाज. त्यांनी फोन ठेवला. त्यात माझ्यासारख्या परदेशी बाईला ओळखपाळख नसताना कोरं करकरीत पुस्तक दिल्याबद्दल आढ्यता किंवा उपकाराची भावना नव्हती, तसंच चिठीचपाटी आणि सहीशिवाय दिलेलं पुस्तक परत येईल का नाही, असा अविश्वास नव्हता. भारतात आले आणि भारतीबाईंची ई-मेल आली.

ज्या अमेरिकन माणसांना आपण चंगळवादी आणि व्यक्तिकेंद्री म्हणतो, त्यांची अशी छान वागण्याची रीत. ग्रंथसमृद्धी आणि ग्रंथालयसमृद्धीच नाही, तर तेथील ग्रंथप्रवृत्ती देखील समृद्ध आहे, त्याचा हा छोटा समृद्ध अनुभव.

**मंजुषा गोसावी**
(महाराष्ट्र टाइम्सवरून)

## ॥रसिक वाचकांना आवाहन॥

वाचकांसाठी आम्ही एक नवे सदर सुरू करीत आहोत. वाचकमित्रहो, आमच्या प्रकाशनाच्या आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दलचे मत पत्ररूपाने कळवा. या पत्रांना शक्य होईल त्याप्रमाणे ग्रंथजगतच्या अंकात प्रसिद्धी दिली जाईल. वाचकांनी स्वत:चे नाव, पत्ता, शिक्षण व व्यवसाय इ. माहितीसह आपली मते कळवावीत.

**आमचा पत्ता**

**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०

## 'अक्षय सुखाचे वरदान - रेकी'

'रेकी' या सध्या चर्चेत असलेल्या उपचारपद्धतीवर अतिशय सुंदर, संतुलित असे पुस्तक वाचण्यात आले. नीलम दोशी यांनी रसाळ आणि साध्या भाषेत लिहिलेले 'अक्षय सुखाचे वरदान - रेकी' हे पुस्तक आजपर्यंतच्या या विषयावरील पुस्तकांमधील मराठीतील उत्तम पुस्तक मानावे लागेल.

रेकीच्या साधकाला सुद्धा या पुस्तकातून रेकीची व्याप्ती पूर्णपणे कळू शकेल. तसेच रेकाची उपयुक्तता वाचकाला सर्व बारकाव्यानिशी समजू शकेल.




एखादे शास्त्रशुद्ध शिबिर ज्या धर्तीवर आयोजित केलेले असते, त्याच धर्तीवर पुस्तकाची मांडणी केली आहे. परंतु रसाळ भाषा, संस्कृत सुभाषितांचा वापर, आवश्यक तेथे समर्पक चित्रे, आकृत्या यांनी वाचकाची उत्सुकता पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. रेकीची पाच मूलतत्त्वे, त्यांचा माणसाच्या जीवनावर असलेला सर्वव्यापी प्रभाव आणि रेकीच्या अभ्यासकाला विचार करायला लावणारे लेखिकेचे भाष्य हा या पुस्तकाचा परमोच्च बिंदू आहे.

सात चक्रे, मानवाच्या शरीरातील त्यांची स्थाने, त्यांचे रंग, त्यांचे कार्य, चक्रांची शुद्धता इत्यादी मुद्देही अत्यंत सोप्या भाषेत स्पष्ट केले आहेत. रेकीचे इतर परिणाम, भडकपणा, किंवा कल्पिताकडे झुकणारे त्याचे परिणाम अत्यंत सौम्य भाषेत मांडले आहेत. डॉ. उसुईंनी रेकीच्या परिणामांबद्दल केलेले भाष्य लेखिकेने आत्मसात केलेले दिसते. डॉ. उसुई म्हणायचे, "Reiki is unbelievable. One need not believe in its results." पुस्तक वाचून रेकीबद्दल वाचकाच्या मनात कोणत्याही अवास्तव अपेक्षा निर्माण होत नाहीत. विशेषत: शरीरावर रेकी ज्या ठिकाणी देतात, त्या विशिष्ठ बिंदूचे आजाराशी असलेले संकेत यांचे विश्लेषण हा या पुस्तकाचा मानबिंदू ठरावा.

थोडक्यात, एक परिपूर्ण पुस्तक वाचल्याचे समाधान निश्चितच मिळते.

**श्रीनिवास म. दांडेकर,** ट्रॅडिशनल रेकी मास्टर, ८२०/७, भांडारकर रोड, पुणे- ४११००४



# मेहता मराठी ग्रंथजगत


- ऑगस्ट २००१
- वर्ष पहिले
- अंक दहावा


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २४ |
| **पुस्तक परिचय** | |
| पोस्टमार्टेम : प. बा. सामंत | २६ |
| नवी पहाट- ओशो : अनु. प्रज्ञा ओक | ३१ |
| सुखद मातृत्व : रत्नावली दातार | ३५ |
| रानातील प्रकाश : विजय पाडळकर | ३८ |
| माझं माझ्यापाशी : व. पु. काळे | ४२ |
| **नवी स्पर्धा** | ४१ |
| **फुले आणि काटे** | ४६ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ४८ |



- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२

Email - mehpubl@vsnl.com


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*